नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २३४ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com






महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026








**शुक्रवार, दि. ०७ ऑगस्ट २०२६**

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक


## थोडक्यात...

### बाजारात केवळ ३० टक्केच शुद्ध पनीर

पुणे (स. गांवकरी) : पनीरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या ॲनालॉग अथवा दुग्धेतर पनीरच्या उत्पादनासह विक्रीवर एक वर्षासाठी बंदीचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या बंदीचे दुग्ध उद्योगातून स्वागत करण्यात आले आहे. ग्राहकांची फसवणूक टाळण्यासोबत दुग्ध उद्योगासाठी फायद्याचा हा निर्णय असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. दरम्यान, बाजारात विक्री होणाऱ्या पनीरमध्ये ॲनालॉग पनीरचा वाटा सुमारे ७० टक्के असावा, असा अंदाज उद्योगातून व्यक्त करण्यात आला आहे. सरकारने ॲनालॉग पनीरचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर एक वर्षासाठी बंदी घातली आहे. राज्यभरातील तपासणीत पनीरचे ३५.४ टक्के नमुने विहित मानकांशी विसंगत आढळले होते. तसेच, अनेक नमुन्यांमध्ये दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पतीजन्य स्निग्धांशाचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले. यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या हितातून सरकारने हा बंदीचा निर्णय घेतला आहे. ॲनालॉग पनीर हे स्वस्त असल्याने हॉटेलमध्ये त्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असल्यावरही बोट ठेवण्यात आले होते.

### सुनेत्रा आणि पार्थ पवार यांच्याशी प्रशांत किशोर यांची चर्चा

मुंबई (स. गांवकरी) : राजकीय रणनीतिकार म्हणून प्रसिद्ध असलेले आणि बिहारमधील जनसुराज्य पक्षाचे संस्थापक आमदार प्रशांत किशोर हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा आधार बनण्याची चर्चा सुरु आहे. गुरुवारी सकाळी उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादीच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ पवार यांच्याशी प्रशांत किशोर यांची प्रदीर्घ चर्चा झाली. किशोर हे यापुढे राष्ट्रवादीचे राजकीय सल्लागार असतील, असे पक्षात बोलले जात आहे. अजित पवार यांनी पक्षफुटीनंतर नरेश अरोरा यांच्या 'डीझाईन बॉक्स' कंपनीला पक्ष प्रसिद्धीचे काम दिले होते. सुनेत्रा पवार पक्षाध्यक्ष होताच 'डीझाईन बॉक्स'ची हकालपट्टी झाली. गेल्या चार महिन्यात पक्षांतर्गत मतभेद चव्हाट्यावर आल्याने पक्षाची प्रतिमा मलीन झाली आहे. पक्षनेतृत्वाला कोणतीही नवी मोहीम राबवता आलेली नाही. पक्षातील आमदारांमध्ये नेतृत्वाविषयी संभ्रम आहे. त्यामुळे पक्षाची छबी सुधारण्यासाठी राष्ट्रवादीला राजकीय रणनितीकाराची गरज वाटते आहे. गेली काही महिने याचा पार्थ पवार यांच्याकडून शोध चालू होता.

### 'आरक्षण बंद करावे का?'

मुंबई (स. गांवकरी) : दिल्लीच्या जंतर-मंतरवर नीट पेपरफुटी प्रकरणाविरोधात विद्यार्थी आंदोलन करत असताना दुसऱ्या बाजूला सोशल मीडियावर 'आरक्षण हटावो' मोहीम सुरू करण्यात आली होती. एकूणच सध्या तरूणांमध्ये आरक्षणाबाबत विविध विचार प्रकट केले जात आहेत. याबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक यांना विचारण्यात आले असता ते म्हणाले, "देशात जोपर्यंत सामाजिक भेदभाव आणि विषमता अस्तित्वात आहे, तोपर्यंत आरक्षण कायम राहिले पाहिजे." मुंबईतील नीता मुकेश अंबानी सांस्कृतिक केंद्र येथे 'इंडियाज इंटरनॅशनल मुव्हमेंट टू युनायटेड नेशन्श'च्या १५ व्या वर्धापन दिन सोहळ्यात डॉ. मोहन भागवत यांनी हजेरी लावली होती. देशभरातून आलेल्या जेन-झी आणि जेन-अल्फा पिढीतील २,००० तरुणांशी त्यांनी यावेळी संवाद साधला. आयआयएमयूएनचे संस्थापक ऋषभ शाह यांनी यावेळी डॉ. मोहन भागवत यांना जंतर-मंतरवरील आंदोलन, आरक्षण आणि तरुणांना भेडसावणाऱ्या समस्यांचे अनेक प्रश्न विचारले.

# माझा 'जेन-झी' पिढीवर पूर्ण विश्वास

## मोहन भागवत यांचं वक्तव्य, विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जवर दिली प्रतिक्रिया

मुंबई : (स. गांवकरी)

नीट पेपरफुटीच्या विरोधात कॉक्रोच जनता पार्टीच्यावतीने दिल्लीत करण्यात आलेल्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केल्याचा आरोप करण्यात आलेला आहे. तसेच दिल्लीतील आंदोलनात काही विद्यार्थ्यांवर 'पॅलेट गन्स'चा वापर करण्यात आल्याचाही आरोप विरोधक करत आहेत. मात्र, हे आरोप पोलिसांनी फेटाळले आहेत. यावरून विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपाने राजकारण तापलं आहे.

दिल्लीत झालेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी आज मुंबईत 'जेन-झी' आणि 'जेन-अल्फा' पिढीतील तरुण व विद्यार्थ्यांशी संवाद साधला आहे. यावेळी मोहन भागवत यांनी त्यांचं मत मांडलं. तसेच दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरही त्यांनी भाष्य केलं. तसेच दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलना दरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्ज आणि 'पॅलेट गन्स'च्या आरोपांवरही मोहन भागवत यांनी प्रतिक्रिया दिली. विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जवर आणि काही विद्यार्थ्यांवर 'पॅलेट गन्स' चालवल्याच्या आरोपांवर तुम्हाला काय वाटतं? विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज झाला हे योग्य की अयोग्य? या प्रश्नावर बोलताना



> जेन झी म्हणजे काय? ते आपलेच लोक आहेत. जर त्यांनी एखाद्या गोष्टीसाठी आंदोलन केलं तर ते चुकीचं कसं? त्यांचं ऐकून घ्यायला हवं. जेन झी ने आंदोलन केलं म्हणून ते आंदोलक देश विरोधी किंवा अँटी नॅशनल ठरत नाहीत असं महत्त्वाचं वक्तव्य मोहन भागवत यांनी केलं. आंदोलन करणं चुकीचं आहे का? असं विचारलं असता मोहन भागवत म्हणाले आंदोलन हा संवादाचाच एक प्रकार आहे. आपण इथे बसून जसं बोलतो आहोत. त्यात मला मुद्दे समजत आहेत, तुम्हाला समजत आहेत. नाहीतर वाद होईल.

मोहन भागवत यांनी म्हटलं की, "हे का घडलं? याच्या खोलात जावं लागेल. त्यासाठी जी माहिती पाहिजे, ती आता माझ्याकडे नाहीये. त्यामुळे मला वाटतं की या प्रश्नावरील तुम्हाला आवश्यक असलेल्या उत्तराची अपेक्षा पूर्ण होणार नाही. मात्र, यामध्ये नेमकं खरं काय, खोटं काय, मला माहिती नाही किंवा कुठे गडबड झाली हे पाहून निर्णय घ्यावा लागेल. मी आता हे सांगू शकत नाही की ते का घडलं? कशामुळे घडलं? काय झालं? कारण त्याबाबत मलाही सविस्तर माहिती नाही", असं मोहन भागवत यांनी म्हटलं आहे.

"मी सकाळी मुंबईत येत होतो, तेव्हा काही न्यूजमध्ये पाहत होतो की काहीजण यामध्ये घुसले आणि त्यांचा भांडाफोड झाला वैगेरे असं मी काही वाचलं. त्यामुळे त्यामध्ये किती तथ्य आहे? हे मला माहिती नाही. मात्र, जर मला डोळे झाकून कोणावर विश्वास ठेवायला सांगितलं, तर मी 'जेन झी'वर विश्वास ठेवेन", असं मोहन भागवत यांनी म्हटलं आहे. ""जेन झी' म्हणजे काय? ते आपलेच आहेत. जर त्यांनी एखाद्या गोष्टीसाठी आंदोलन केलं तर ते चुकीचं कसं? त्यांचं ऐकून घ्यायला हवं.'जेन झी'ने आंदोलन केलं म्हणून ते आंदोलक देश विरोधी किंवा अँटी नॅशनल ठरत नाहीत", असं महत्त्वाचं वक्तव्य मोहन भागवत यांनी केलं. आंदोलन करणं चुकीचं आहे का? असं विचारलं असता मोहन भागवत म्हणाले आंदोलन हा संवादाचाच एक प्रकार आहे. आपण इथे बसून जसं बोलत आहोत. त्यात मला मुद्दे समजत आहेत, तुम्हाला समजत आहेत. नाहीतर वाद होईल. एखादी गोष्ट सुटण्यासारखी नसेल तर वाद होईल मी तुम्हाला खेचून आणेन. हे आधी करा, असं करेन. लोकशाहीत आंदोलन करणं हे काही गैर नाही. आंदोलन करण्यात काहीही गैर नाही. पण त्याचा उपयोग हा कुठल्याही विभाजनासाठी होता कामा नये. 'जेन झी'ने जे आंदोलन केलं, त्याचा उद्देश योग्य होता. भारताच्या शिक्षण धोरणात बऱ्याच गोष्टी होणं गरजेचं आहे, त्या होत नाहीत, त्याची चर्चा होते. त्यामुळे संवाद हा असलाच पाहिजे. संवाद साधून जर गोष्टी साध्य होत नसतील काय करायचं हा भाग पुढचा आहे", असं मत भागवत यांनी व्यक्त केलं.

# सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्षाचा खटला निर्णायक वळणावर

## एकनाथ शिंदे पंतप्रधान मोदींना भेटणार

मुंबई : (स. गांवकरी)

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शुक्रवारी राजधानी दिल्लीत पंतप्रधान मोदी यांची भेट घेणार आहेत. आज सकाळी नऊ वाजता एकनाथ शिंदे हे ठाकरे गटातून फुटून बाहेर पडलेल्या सहा खासदारांसोबत मोदींच्या भेटीला जाणार आहेत. पंतप्रधान मोदी या खासदारांसोबत सकाळचा नाश्ता करणार आहेत. त्यामुळे या भेटीत काय घडणार, मोदींकडून ठाकरे गट सोडून शिंदेंसोबत आलेल्या खासदारांना काय कानमंत्र दिला जाणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. सध्या दिल्लीत सर्वोच्च न्यायालयात शिवसेना चिन्ह आणि आमदार अपात्रता प्रकरणावर सुनावणी सुरु आहे. ही सुनावणी निर्णायक टप्प्यावर आहे. गेल्या दोन दिवसांत ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी ठाकरे गटाच्या बाजूने जोरदार युक्तिवाद केला होता. यानंतर शिवसेना पक्ष आणि चिन्ह पुन्हा ठाकरे गटाला मिळू शकते, असा आशा कुठेतरी पल्लवित झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे आणि पंतप्रधान मोदी यांची भेट महत्त्वाची मानली जात आहे. उभय नेत्यांमध्ये या विषयावर स्वतंत्रपणे चर्चा होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तसेच 'जेन झी' च्या आंदोलनानंतर देशभरातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मोदीजी एनडीएच्या



घटक पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करत आहेत. त्यामुळे आजच्या बैठकीत पंतप्रधान मोदींकडून एकनाथ शिंदे यांच्याकडून महाराष्ट्रातील परिस्थितीचा आढावा घेतला जाण्याची शक्यता आहे. उबाठाच्या सहा खासदारांनी नुकताच शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्या खासदारांसह शिवसेनेच्या काही खासदारांनी नुकतीच गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. त्यानंतर आता ते आता पंतप्रधानांची भेट घेणार आहेत. शिवसेना खासदारांच्या मतदारसंघातील विकासकामांबाबत या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, संभाव्य मंत्रिमंडळ विस्ताराबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शिंदे यांच्यात चर्चा होण्याची शक्यता आहे. बिहारमधील बांकीपूर या भाजपचा बालेकिल्ला असणाऱ्या विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत विजयी झालेले जनसुराज पक्षाचे संस्थापक आणि निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांना भेटण्यासाठी मुंबईत आले आहेत.

# शंभर महिलांमागे नऊ महिलांना तंबाखूची तलफ

पुणे : (स. गांवकरी)

राज्यातील प्रत्येक १०० महिलांमागे जवळपास नऊ महिला कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील तंबाखूचे सेवन करतात अशी धक्कादायक बाब राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणातून समोर आली आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील महिलांमध्ये हे प्रमाण ११.८ टक्के असून शहरी भागात ते ४.५ टक्के आहे. एकूण राज्यात महिलांमधील तंबाखू सेवनाचे प्रमाण ८.८ टक्के नोंदविण्यात आले आहे. विशेष म्हणजे ग्रामीण महिलांमध्ये हे प्रमाण शहरी भागाच्या सुमारे अडीच पट आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाचे २०२४ चे आकडे प्रसिद्ध करण्यात आले. या राष्ट्रीय सर्वेक्षणाचा सहावा अंक नुकताच प्रसिद्ध करण्यात आला. त्यावरून ही धक्कादायक बाब समोर आली. पुरुषांमध्ये तंबाखूचे व्यसन अधिक असून ३१.३ टक्के पुरुष तंबाखूचे सेवन करतात. त्यामध्ये ग्रामीण



भागात हे प्रमाण ३८.१ टक्के, तर शहरी भागात २१.९ टक्के आहे. महिलांपेक्षा पुरुषांमध्ये तंबाखूचे व्यसन साडेतीनपट आहे. मद्यपानाच्या बाबतीत महिलांमध्ये प्रमाण अत्यल्प असून केवळ ०.३ टक्के महिला मद्यपान करतात. याउलट १२.२ टक्के पुरुष मद्यपान करतात. ग्रामीण भागातील १३.१ टक्के, तर शहरी भागातील ११ टक्के पुरुष मद्यपान करत असल्याची नोंद आहे. म्हणजे पुरुषांमध्ये मद्यपानाचे प्रमाण महिलांच्या तुलनेत सुमारे ४० पट अधिक आहे.

# सावजी रेस्टॉरंट्स बंद पडतील असे बोलू नका : बावनकुळे





नागपूर : (स. गांवकरी)

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सावजी मटणाबाबत केलेल्या वक्तव्यावरून सुरू झालेला वाद आणखी तीव्र झाला आहे. आता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सावजी व्यवसायाच्या पाठीशी ठामपणे उभे राहत, अधिकाऱ्यांनी अशा प्रकारची विधाने टाळावीत, असा स्पष्ट इशारा दिला आहे.

अमरावती येथील एका कार्यक्रमात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी, "मी जर सावजी मटण खाल्ले तर महिनाभर आजारी पडेन आणि हॉस्पिटलमध्ये जावे लागेल," असे वक्तव्य केले होते. या विधानानंतर सावजी रेस्टॉरंट चालक आणि विविध संघटनांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. विदर्भाच्या खाद्यसंस्कृतीचा अवमान झाल्याचा आरोपही करण्यात आला. मुंबईत पत्रकारांशी बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तुकाराम मुंढे यांच्या वक्तव्यावर थेट आक्षेप घेतला. सावजी हा केवळ एक खाद्यपदार्थ नसून विदर्भाची ओळख असल्याचे त्यांनी सांगितले. तीन-चार पिढ्यांपासून हजारो कुटुंबे या व्यवसायावर अवलंबून असून, हा विदर्भाच्या अर्थकारणाचा आणि संस्कृतीचाही महत्त्वाचा भाग असल्याचे

## वाद आता कोणत्या टप्प्यावर?

> तुकाराम मुंढे यांच्या वक्तव्यानंतर सावजी व्यवसायाशी संबंधित संघटना, व्यापारी आणि विविध सामाजिक संघटनांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सार्वजनिकपणे भूमिका घेतल्याने हा वाद आता प्रशासकीय पातळीवरून राजकीय पातळीवरही पोहोचला असून, सावजीच्या मुद्द्यावर राज्यातील चर्चा अधिक तीव्र झाली आहे.

त्यांनी स्पष्ट केले. सावजी ही मसाले आणि पदार्थ बनवण्याची पारंपरिक पद्धत आहे. विदर्भात येणाऱ्या अनेक पर्यटकांना आणि पाहुण्यांना सावजी जेवणाचा आस्वाद घ्यायचा असतो. या मसाल्याची चव आणि पद्धत ही वेगळी असून, त्याची मागणी देशासह परदेशातही वाढत आहे. त्यामुळे संपूर्ण सावजी व्यवसायावर नकारात्मक टिप्पणी करणे योग्य नसल्याचे बावनकुळे म्हणाले. अन्नात भेसळ आढळल्यास किंवा आरोग्याला धोका निर्माण करणारी बाब समोर आल्यास संबंधित आस्थापनावर कायदेशीर कारवाई करावी, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. मात्र एखाद्या घटनेच्या आधारे संपूर्ण उद्योगालाच दोषी ठरवणे योग्य नाही. चुकी करणाऱ्यांवर कारवाई व्हावी, पण संपूर्ण व्यवसायाला लक्ष्य करू नये, असे त्यांनी नमूद केले. सावजी व्यवसाय हा हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधार आहे. त्यामुळे "रेस्टॉरंट्स बंद पडतील", "हा व्यवसाय संपेल" किंवा त्याला फटका बसेल, अशा प्रकारची विधाने अधिकाऱ्यांनी करू नयेत, असा स्पष्ट इशारा बावनकुळे यांनी दिला. अशा वक्तव्यांचा परिणाम हजारो व्यावसायिक आणि त्यांच्या कुटुंबांवर होऊ शकतो, असेही ते म्हणाले.

# विधानमंडळ अंदाज समितीकडून अधिकाऱ्यांची झाडाझडती

## नगरमधील ओढे-नाल्यांवरील अनधिकृत बांधकामे; वाळू व अवजड वाहतूक

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

विधानमंडळ अंदाज समितीचा जिल्ह्यातील विकास कामांच्या पाहणी व तपासणीसाठी आज, गुरुवारपासून जिल्हा दौऱ्याला सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी समितीच्या २७ सदस्यांपैकी केवळ ७ सदस्य सहभागी झाले होते. समितीच्या बैठकीत वाळू उपशामुळे खराब होणारे रस्ते तसेच नगर शहरात ओढे-नाल्यांवर अतिक्रमणे करून झालेली बांधकामे याबद्दल झाडाझडती घडली.

आमदार अर्जुन खोतकर यांच्या अध्यक्षतेखालील ही समिती आज, उद्या, शुक्रवार व परवा, शनिवारी असे तीन दिवस जिल्ह्यात आहे. समितीच्या २७ सदस्यांपैकी १६ सदस्यांनी दौऱ्यात सहभागी होणार असल्याचे कळवले होते. प्रत्यक्षात ७ सदस्य उपस्थित राहिले. उर्वरित सदस्य उद्या व परवा सहभागी होतील असे खोतकर यांनी सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे सीईओ आनंद भंडारी, जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी समितीचे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती देऊन स्वागत केले.



समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातील बंद सभागृहात आढावा विभाग प्रमुखांकडून आढावा घेतला. सकाळच्या सत्रात आरटीओ, महापालिका व कृषी विभागाकडून माहिती घेण्यात आली. बैठकीची माहिती बाहेर कोणी देऊ नये अशी सक्त सूचना करण्यात आली होती. समितीला महापालिकेकडून चुकीची आकडेवारी सादर झाल्याने गोंधळ उघड झाला. सुधारित आकडेवारी सादर करण्यास सांगण्यात आले. शहरातील ओढे-नाल्यावर झालेली अनधिकृत बांधकामे, सारडा महाविद्यालयजवळ नाल्यांवर झालेले बांधकाम, दीर्घकाळ प्रलंबित असलेली फेज-२ योजना, अमृत पाणी योजना यासह यूआयडीएसएससी योजनेतील कामांची माहिती महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडून समितीने मागवली. समितीच्या आढावा बैठकीत वाळू वाहतूकीच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यात आले. वाळूतून प्रत्यक्षात मिळणारा महसूल व त्या तुलनेत अधिक रकमेचे खराब होणारे, यामध्ये प्राधान्य कशाला द्यायचे असा प्रश्न समितीने उपस्थित केला. मोठ्या मालमोटारीऐवजी छोट्या वाहनातून वाळू वाहतूक करण्याची सूचना करण्यात आली. क्षमतेपेक्षा अधिक वजनाच्या वाहतुकीबद्दलही आरटीओला विचारणा करण्यात आली.

> समितीचा दौरा तीन दिवसांचा आहे. आज अधिकाऱ्यांकडून कामांची माहिती घेण्यात आली. उद्या आणखीन काही आमदार सहभागी झाल्यास त्यांचे गट करून जिल्ह्यातील कामांची तपासणी केली जाणार आहे. त्यासाठी विविध ठिकाणी भेटी दिल्या जाणार आहेत. परवा पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्रुटींबद्दल चर्चा केली जाणार आहे.

राज्यात सर्वाधिक ४८ लाख दूध उत्पादन व संकलन नगर जिल्ह्यात होत असल्याबद्दल समितीने कौतुक केले. याचा आदर्श इतर जिल्ह्यांनी घेतला पाहिजे, असेही समितीकडून सांगण्यात आले. समितीची बैठक सुरू होण्यापूर्वी अध्यक्ष खोतकर यांची शहरातील शिवसेना पदाधिकारी संभाजी कदम, संदेश कार्ले, विक्रम राठोड, रामदास भोर, बाळासाहेब बोराटे आदींनी भेट घेतली.

# OBC राजकारणात नवा टर्निंग पॉइंट

## मंडल यात्रा आणि महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे कशी बदलली!

मुंबई : (स. गांवकरी)

भारतात 'जातनिहाय जनगणना' हा विषय पुन्हा एकदा देशाच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर अत्यंत तीव्रतेने ऐरणीवर आला आहे. केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेला तत्त्वतः मंजुरी दिल्यानंतर, महाराष्ट्रात ओबीसी संघटना आणि राजकीय नेत्यांनी या प्रक्रियेला गती देण्याची मागणी लावून धरली आहे. याच पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली भंडारा येथून विदर्भातील 11 जिल्ह्यांमध्ये '5वी मंडल जनगणना यात्रा' सुरू झाली असून, यामुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या यात्रेच्या माध्यमातून केवळ जनगणनेची मागणीच केली जात नाही, तर दरवर्षी ओबीसी समाजाच्या विकास निधीत सुमारे 15 हजार कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याचा खळबळजनक दावाही करण्यात आला आहे. सामान्य जनगणनेमध्ये देशाची एकूण लोकसंख्या, वय, लिंग, शिक्षण, रोजगार, घरांची स्थिती आणि स्थलांतर अशा पायाभूत आणि मूलभूत माहितीची नोंद केली जाते. मात्र, जातनिहाय जनगणनेमध्ये या सामान्य घटकांसोबतच देशातील प्रत्येक नागरिकाची जात, उपजात आणि त्यासंबंधित सामाजिक-आर्थिक



परिस्थितीची अधिकृत नोंद सरकारकडून घेतली जाते. या जनगणनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे सरकारकडे प्रत्येक समाजाची खरी लोकसंख्या, शिक्षणाची पातळी, रोजगाराचे प्रमाण, आर्थिक स्थिती, सरकारी सेवांमधील प्रतिनिधित्व आणि विकासाची अचूक आकडेवारी उपलब्ध होते. या अधिकृत डेटाच्या आधारे सरकारला 'डेटा-ड्रिव्हन' धोरणे आखता येतात. प्रत्येक घटकाला त्याच्या लोकसंख्येच्या आणि गरजेच्या प्रमाणात निधी व योजनांचा लाभ देणे यामुळे शक्य होते. भारतात ब्रिटिश काळात 1931 मध्ये अखेरची संपूर्ण आणि अधिकृत जातनिहाय जनगणना झाली होती. स्वातंत्र्योत्तर काळात, म्हणजेच 1951 पासूनच्या जनगणनेत केवळ अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) यांचीच माहिती संकलित केली जात राहिली. इतर मागासवर्गीय (OBC) समाजाची अधिकृत लोकसंख्या सरकारकडे उपलब्धच राहिली नाही.

# थोडक्यात पण महत्वाचे

## कीमतीचे दुसरे स्टोअर; महाराष्ट्रातील विस्ताराला नवी चालना



पुणे (स. गांवकरी) : डिझाइन-केंद्रित लॅब-ग्रोन डायमंड ज्वेलरी ब्रँड 'कीमती ज्वेल्स'ने पुण्यातील बाणेर येथे आपले नवीन स्टोअर सुरू केले आहे. अरमान कोठारी यांनी स्थापन केलेल्या या ब्रँडला कोठारी समूह, उद्योजक निखिल कामत आणि केविन शाह यांचे पाठबळ लाभले आहे. या नव्या स्टोअरमुळे राज्यातील ब्रँडची ग्राहकांपर्यंत पोहोच आणखी मजबूत झाली आहे. मुंबईतील अंधेरी येथील फ्लॅगशिप स्टोअर आणि पुण्यातील खराडी येथील विद्यमान स्टोअरनंतर बाणेरमधील हे नवे स्टोअर महाराष्ट्रातील ब्रँडचे तिसरे रिटेल केंद्र ठरले आहे. भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या लक्झरी ग्राहक बाजारपेठांपैकी एक असलेल्या महाराष्ट्रात समकालीन फाईन ज्वेलरी अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याच्या ब्रँडच्या वचनबद्धतेला या विस्तारामुळे अधिक बळ मिळाले आहे.

## मोरेपेन लॅबोरेटरीजचा नफा; EBITDA २०७ टक्के, PAT मध्ये ३९४ टक्के वाढ

पुणे (स. गांवकरी) : मोरेपेन लॅबोरेटरीज लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२७च्या पहिल्या तिमाहीत आतापर्यंतचा सर्वाधिक तिमाही महसूल आणि नफा नोंदवला आहे. कंपनीचा तिमाही महसूल ३४ टक्क्यांनी वाढून ५७५.३१ कोटी रुपयांवर पोहोचला. EBITDA मध्ये तब्बल २०७ टक्क्यांची वाढ होत तो ८७.७२ कोटी रुपये झाला, तर करानंतरचा नफा (PAT) ३९४ टक्क्यांनी वाढून ५६.३५ कोटी रुपयांवर पोहोचला. कंपनीच्या निर्यात महसुलात १११ टक्के वाढ झाली. API व्यवसायात ३१ टक्के, तर API निर्यातीत ४२ टक्के वाढ नोंदवण्यात आली. मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायानेही १९ टक्के वाढ नोंदवली. दरम्यान, कंपनीचा ८२५ कोटी रुपयांचा CDMO करार आता पूर्ण व्यावसायिक अंमलबजावणीच्या टप्प्यात दाखल झाला आहे. या अंतर्गत पहिल्या तिमाहीत ५८ कोटी रुपयांच्या व्यावसायिक पुरवठ्याची पूर्तता करण्यात आली. कंपनीच्या 'Morepen 2.0' धोरणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. मोरेपेन लॅबोरेटरीजचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सुशील सुरी यांनी सांगितले की, तिमाहीतील विक्रमी कामगिरी कंपनीच्या परिवर्तनाच्या प्रवासाला बळ देणारी आहे. API व्यवसायातील सुधारणा, निर्यातीत वाढ आणि CDMO क्षेत्रातील विस्तारामुळे कंपनीच्या आगामी वाढीच्या संधी अधिक मजबूत झाल्या आहेत. कंपनीने सलग चौथ्यांदा USFDA तपासणी पूर्ण केली असून, Form 483 अंतर्गत कोणतीही निरीक्षण नोंद झालेली नाही. FY30 पर्यंत उत्पादन क्षमता १,२०० KL पर्यंत वाढवण्याचे कंपनीचे नियोजन आहे.

## एअरटेलची आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या तिमाहीत दमदार कामगिरी

गुरुग्राम (स. गांवकरी) : भारती एअरटेल लिमिटेडने 30 जून 2026 रोजी संपलेल्या तिमाहीचे लेखापरीक्षित एकत्रित आर्थिक निकाल जाहीर केले. आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या तिमाहीत भारती एअरटेलने दमदार कामगिरी करत 1.49 कोटी नवीन ग्राहक जोडले आणि 15 देशांतील एकूण ग्राहकसंख्या 68.1 कोटींवर पोहोचली. कंपनीचा एकत्रित महसूल 18.4 टक्क्यांनी वाढून 58,539 कोटी रुपये झाला, तर भारतातील महसूल 41,214 कोटी रुपये झाला. मोबाईल ग्राहकांकडून मिळणारे सरासरी उत्पन्न (ARPU) 250 रुपयांवरून 264 रुपयांवर वाढले. पोस्टपेड विभागात विक्रमी 10 लाख नवीन ग्राहक जोडले गेले, तर होम ब्रॉडबँड, एअरटेल बिझनेस आणि आफ्रिका व्यवसायातही चांगली वाढ झाली. या तिमाहीत एअरटेलने 5G तंत्रज्ञानावर आधारित पोस्टपेड फास्ट लेन सेवा, उद्योगांसाठी एअरटेल सिक्योर वर्कफोर्स सुरक्षा प्लॅटफॉर्म सुरू केला तसेच देशभरात नवीन टॉवर्स आणि फायबर नेटवर्कचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला.

## 'कोना कोना शिक्षा' उपक्रमातून ३.६ लाख युवक वित्तीय साक्षर



मुंबई (स. गांवकरी) : कोटक सिक्युरिटीज लिमिटेडच्या 'कोना कोना शिक्षा' या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमाद्वारे जुलै २०२१ पासून देशातील सुमारे ३.६ लाख तरुणांना वित्तीय साक्षरतेचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. वित्तीय वर्ष २०२५-२६ मध्येच या उपक्रमातून २९३ शहरांतील ९०९ महाविद्यालयांमधील ७२ हजार ६२४ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोच साधण्यात आली. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्स (NISM) यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात वैयक्तिक वित्त, गुंतवणुकीची मूलतत्त्वे, सिक्युरिटीज बाजारपेठ आणि वित्तीय नियोजन याविषयी १० तासांचा अभ्यासक्रम दिला जातो. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना ऑनलाइन मूल्यांकनाद्वारे NISM चे प्रमाणपत्रही प्रदान केले जाते. कोटक सिक्युरिटीजने या उपक्रमाच्या माध्यमातून वित्तीयदृष्ट्या सक्षम आणि जागरूक युवा पिढी घडविण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

## तुंबाडची मंजुळा'चा ७ ऑगस्टला मराठी ZEE5 वर डिजिटल प्रीमियर




मुंबई (स. गांवकरी) : वर्षातील मोठ्या मराठी चित्रपटांपैकी एक ठरलेल्या 'तुंबाडची मंजुळा'चा जागतिक डिजिटल प्रीमियर ७ ऑगस्ट रोजी मराठी ZEE5 वर होणार आहे. चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांचे प्रेम मिळवल्यानंतर भय, विनोद, नाट्य आणि भावनिक कथानकाची सांगड घालणारा हा चित्रपट आता डिजिटल माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. विविध कोरगांवकर दिग्दर्शित आणि झी स्टुडिओज निर्मित 'तुंबाडची मंजुळा'मध्ये जितेंद्र जोशी, ओम भुतकर, मकरंद अनासपुरे, सई ताम्हणकर आणि उषा नाडकर्णी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. भय-विनोद प्रकारातील या चित्रपटात मनोरंजनासोबत अंधविश्वास, सामाजिक पूर्वग्रह आणि माणुसकीचा संदेशही अधोरेखित करण्यात आला आहे. चित्रपटाची कथा केशव या पात्राभोवती फिरते. केशव आपल्याला मंजुळा नावाच्या महिलेच्या आत्म्याने झपाटल्याचे खोटे सांगतो. त्याच्या या एका खोट्यामुळे संपूर्ण गावात गोंधळ उडतो. स्वतःची प्रतिष्ठा वाचवण्यासाठी सुरू झालेला खेळ पुढे भुतांच्या कथा, अंधश्रद्धा आणि अनपेक्षित घटनांच्या मालिकेत बदलतो. त्यातून निर्माण होणाऱ्या विचित्र परिस्थिती प्रेक्षकांना हसवतानाच कथेला भय आणि भावनांची किनार देतात. चित्रपटाबाबत ZEE मराठीच्या चीफ चॅनल ऑफिसर आणि मराठी ZEE5च्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. यांनी सांगितले की, 'तुंबाडची मंजुळा' मराठी ZEE5 वर आणताना आनंद होत आहे. भीतीदायक थरार आणि पोट धरून हसायला लावणाऱ्या विनोदाचे मिश्रण असलेला हा चित्रपट संपूर्ण कुटुंबासाठी मनोरंजनाची मेजवानी ठरेल. कोकणच्या पार्श्वभूमीवर साकारलेली कथा आणि कलाकारांचा अभिनय प्रेक्षकांना नक्कीच गुंतवून ठेवेल.

# AM/NS इंडिया स्टीलची ताकद; भारतीय नौदलात INS मालवण दाखल

### AM/NS इंडियाने भारतीय नौदलाच्या नव्याने ताफ्यात सामील झालेल्या INS मालवण या युद्धनौकेसाठी 100% विशेष नेव्हल-ग्रेड स्टीलचा पुरवठा केला

नवी दिल्ली/मुंबई : (स. गांवकरी)



आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS इंडिया) ने 22 जुलै 2026 रोजी कारवार, कर्नाटक येथे भारतीय नौदलाच्या ताफ्यात सामील झालेल्या INS मालवण या नवीन स्वदेशी बनावटीच्या पाणबुडीविरोधी युद्धनौकेच्या (ASW-SWC) बांधणीसाठी आवश्यक असलेल्या 100% विशेष स्टीलचा पुरवठा केला. गुजरात मधील हझिरा येथील AM/NS इंडियाच्या एकात्मिक स्टील निर्मिती प्रकल्पात तयार झालेले हे विशेष स्टील देशाच्या वाढत्या संरक्षण उत्पादन व्यवस्थेला आणि सागरी सुरक्षेला बळ देण्यामध्ये प्रगत भारतीय स्टील निर्मितीची भूमिका अधोरेखित करते. हे यश महत्त्वपूर्ण राष्ट्रीय उपक्रमांसाठी अत्यंत आवश्यक कच्चा माल पुरवून भारताच्या आत्मनिर्भरतेच्या प्रवासातील AM/NS इंडियाचे योगदान अधिक मजबूत करते.

AM/NS इंडियाच्या विक्री व विपणन विभागाचे संचालक आणि उपाध्यक्ष रंजन धार म्हणाले: "INS मालवणचे भारतीय नौदलात सामील होणे हे दाखवून देते की, भारतातील प्रगत उत्पादन क्षेत्र देशाच्या संरक्षण सज्जतेला कशी मदत करत आहे. विशेष नेव्हल-ग्रेड स्टील तयार करण्यासाठी कडक दर्जाचे निकष, प्रगत धातूशास्त्राचे ज्ञान आणि ग्राहकांसोबत जवळून काम करणे आवश्यक असते. AM/NS इंडियाचे स्टील भारतीय नौदलाच्या नवीन पिढीच्या युद्धनौकांसाठी उपयुक्त ठरत आहे आणि देशांतर्गत संरक्षण उत्पादनाला बळ देण्याच्या भारताच्या ध्येयाला पाठिंबा देत आहे, याचा आम्हाला अभिमान आहे."

कोचिन शिपयार्ड लिमिटेडने बनवलेली INS मालवण ही आठ माहे-क्लास ASW-SWCs युद्धनौकांपैकी दुसरी आणि भारतीय नौदलाच्या ताफ्यात सामील होणारी या वर्गातील दुसरी युद्धनौका आहे. 80% पेक्षा जास्त स्वदेशी घटकांचा वापर करून बनवलेला हा उपक्रम भारत सरकारच्या आत्मनिर्भर भारत आणि विकसित भारत उपक्रमांना बळ देतो,

तसेच नौदल डिझाइन, अभियांत्रिकी, प्रणाली एकत्रीकरण आणि संरक्षण जहाजबांधणी क्षेत्रातील देशाची वाढती क्षमता दाखवून देतो. पाणबुडीविरोधी युद्ध, पाण्याखालील देखरेख, माईन वॉरफेअर आणि किनारी सुरक्षेच्या मोहिमांसाठी डिझाइन केलेली INS मालवण भारताच्या सागरी हितांचे रक्षण करण्याची आणि किनारी भागात प्रभावीपणे काम करण्याची भारतीय नौदलाची क्षमता अधिक मजबूत करेल. AM/NS इंडिया भारतीय नौदलासाठी बांधल्या जाणाऱ्या आठ ASW-SWC जहाजांच्या ताफ्यासाठी लागणाऱ्या संपूर्ण विशेष पोलादाचा पुरवठा करत आहे. या उपक्रमाव्यतिरिक्त, कंपनीने INS विशाखापट्टणम आणि INS सुरत यांसारख्या प्रमुख नौदल युद्धनौकांसाठीही विशेष स्टीलचा पुरवठा केला आहे.

कंपनीने चेनाब रेल्वे ब्रिज, अंजी खाड रेल्वे ब्रिज, बोगीबील ब्रिज आणि इंडिया-बेस्ड न्यूट्रिनो ऑब्झर्व्हेटरी यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्येही आपले योगदान दिले आहे. एकत्रितपणे, हे प्रकल्प राष्ट्रीय सुरक्षा मजबूत करण्यात, आत्मनिर्भरतेला पाठिंबा देण्यात आणि धोरणात्मक पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्यात प्रगत भारतीय स्टील निर्मितीची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करतात.

# योग्य वेळेची वाट पाहण्यापेक्षा नियमित गुंतवणुकीवर भर

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

share.market

भारतातील रिटेल गुंतवणुकीचा प्रवास आता नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. संपत्ती निर्माण करणे ही आता एक सवय होऊ लागली आहे. प्रथमच गुंतवणूक करणारे बहुतांश गुंतवणूकदार शिस्तबद्ध गुंतवणुकीचा स्वीकार करत असल्यामुळे, दैनंदिन एसआईपी हा दीर्घकालीन संपत्ती निर्मितीचा प्रभावी पर्याय म्हणून पुढे येत आहे. दररोज केवळ ₹10 पासून गुंतवणूक करण्याची सुविधा उपलब्ध करून देत, फोनपे म्युच्युअल फंड्सने गुंतवणुक सुरू करण्याच्या मार्गातील अडथळा कमी केला आहे. त्याचबरोबर गुंतवणुकीतील एक मूलभूत तत्त्वही अधिक अधोरेखित केले आहे : योग्य वेळ साधण्यापेक्षा सातत्यपूर्ण गुंतवणूक अधिक महत्त्वाची. याचे प्रतिबिंब फोनपे म्युच्युअल फंड्सच्या दैनंदिन एसआईपी च्या आकडेवारीतून स्पष्टपणे दिसून येते. डिसेंबर 2025 मध्ये ही सुविधा सुरू झाल्यापासून या प्लॅटफॉर्मवर दैनंदिन एसआईपी करणाऱ्या 5 लाखांहून अधिक गुंतवणूकदारांनी नोंदणी केली आहे. यावरून छोट्या-छोट्या रकमेची, पण सातत्याने केली जाणारी गुंतवणूक स्वीकारण्याची प्रवृत्ती वेगाने वाढत असल्याचे दिसून येते. 2026 मध्ये या सुविधेला आणखी वेग मिळाला आहे. जानेवारी 2026 ते जून 2026 या कालावधीत फोनपे म्युच्युअल फंड्सच्या दैनंदिन एसआईपी च्या व्यवहारांमध्ये जवळपास 5 पट वाढ झाली. सरासरी ₹50 इतक्या गुंतवणुकीसह, दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी दैनंदिन एसआईपी ही प्रभावी आर्थिक सवय ठरत असल्याचे दिसून आले आहे.

# कॉग्निझंटकडून १० हजार कर्मचाऱ्यांसाठी 'ओपनएआय कोडेक्स हॅकेथॉन'

### पुण्यासह सहा शहरांत आयोजन; आगामी काळात ५० हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांपर्यंत उपक्रम विस्तारण्याचे उद्दिष्ट

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

cognizant

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञान सेवा क्षेत्रातील कॉग्निझंटने ओपनएआयच्या सहकार्याने प्रथमच जागतिक स्तरावरील 'कोडेक्स हॅकेथॉन'चे आयोजन केले. 'इंजिनिअरिंग द फ्रंटियर' या संकल्पनेवर आधारित या हॅकेथॉनमध्ये पुण्यासह चेन्नई, हैदराबाद, बेंगळुरू, कोईम्बतूर आणि कोची या सहा शहरांतील कॉग्निझंटचे सुमारे १० हजार कर्मचारी सहभागी झाले आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना ओपनएआय कोडेक्सचा वापर करून शिकणे, प्रयोग करणे आणि विविध व्यावसायिक समस्यांवर कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपाय विकसित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. कोडेक्स-बॅज प्राप्त व्यावसायिकांचा समूह वाढविणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित कौशल्यांचा प्रत्यक्ष व्यावसायिक वापर करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

यापूर्वी कॉग्निझंटला कृत्रिम बुद्धिमत्ता निर्मिती क्षमतांसाठी ओपनएआयकडून मान्यता मिळाली होती. जगभरातील उद्योग क्षेत्रातील ग्राहकांवर कोडेक्सचा होणारा परिणाम मोजण्यासाठी निवडण्यात आलेल्या आघाडीच्या जागतिक प्रणाली एकत्रीकरण कंपन्यांमध्ये कॉग्निझंटचा समावेश करण्यात आला आहे. ओपनएआयच्या स्ट्रॅटेजिक ग्लोबल पार्टनरशिप अँड इकोसिस्टम्सचे उपाध्यक्ष कोलीन कापसे म्हणाले, "कॉग्निझंट आपल्या कार्यबलामध्ये मोठ्या प्रमाणावर कोडेक्सचा वापर वाढवत आहे. त्यामुळे भारतातील १० हजार कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान शिकण्याची, त्यावर प्रयोग करण्याची आणि नवीन उपाय तयार करण्याची संधी मिळत आहे. उद्योग क्षेत्रातील ग्राहकांसाठी या कौशल्यांचे व्यावहारिक उपायांमध्ये रूपांतर करण्याच्या कॉग्निझंटच्या महत्त्वाकांक्षेतील हा हॅकेथॉन महत्त्वाचा पहिला टप्पा आहे." कॉग्निझंट इंडियाचे अध्यक्ष (ग्लोबल ऑपरेशन्स), चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक राजेश वारियर म्हणाले, "कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षमतेसोबत मानवी निर्णयक्षमतेची सांगड घालणे हे उद्योगांना अपेक्षित परिणाम मिळवून देण्यासाठी महत्त्वाचे आहे. भारतात जागतिक कोडेक्स हॅकेथॉन आयोजित करणे हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे.

कर्मचाऱ्यांना कोडेक्ससारख्या अत्याधुनिक साधनांमध्ये प्रत्यक्ष प्राविण्य मिळविण्याबरोबरच व्यावसायिक मूल्य निर्माण करणारे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपाय विकसित करण्याची संधी यातून मिळणार आहे."

हॅकेथॉनमध्ये सहभागींना प्रत्यक्ष समस्यांवर काम करत कोडेक्सचा अनुभव घेणे, ओपनएआयच्या विशेष मास्टरक्लासमध्ये सहभागी होणे, निवडक अध्ययन स्रोतांचा वापर करणे तसेच कॉग्निझंटमधील अभियंते आणि नवसंशोधकांसोबत काम करण्याची संधी देण्यात आली आहे. याशिवाय व्यवसाय आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील वरिष्ठांसमोर आपल्या कल्पना आणि उपाय सादर करण्याची संधीही सहभागींना मिळणार आहे.

कंपनीने येत्या काही महिन्यांत या उपक्रमाची व्याप्ती आणखी वाढविण्याचे नियोजन केले असून ५० हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांपर्यंत सहभाग पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

# रोगांविरोधात बायरचे 'झिवाना स्मार्ट' बुरशीनाशक सादर

*डाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइट रोगांवर नियंत्रण; द्राक्षांसह बटाटा, टोमॅटो व काकडीवर्गीय पिकांसाठी उपयुक्त*

मुंबई : (स. गांवकरी)




बागायतदार शेतकऱ्यांना पिकांवरील विनाशकारी रोगांचा प्रभावीपणे सामना करता यावा यासाठी बायरने पुढच्या पिढीतील 'झिवाना™ स्मार्ट' हे नवीन बुरशीनाशक सादर केले आहे. डाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइट यांसारख्या रोगांपासून उच्च मूल्याच्या फलोत्पादन पिकांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे. एफआरएसी गट ४९ अंतर्गत असलेल्या नवीन सक्रिय घटकाच्या साहाय्याने 'झिवाना™ स्मार्ट' द्राक्षे, काकडीवर्गीय पिके, बटाटा आणि टोमॅटोमधील रोगांवर प्रभावी नियंत्रण देते. त्यामुळे पिकांची गुणवत्ता टिकविणे, उत्पादकता सुधारणे आणि शेतकऱ्यांचा परतावा वाढविण्यास मदत होणार असल्याचे कंपनीने म्हटले आहे. तसेच रोगांमध्ये प्रतिरोधकता विकसित होण्याचा धोका कमी करण्याच्या दृष्टीने हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे. डाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइट हे फलोत्पादन पिकांवर परिणाम करणाऱ्या विनाशकारी रोगांपैकी प्रमुख रोग आहेत. या रोगांच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांच्या पीक संरक्षणावरील खर्चाचा मोठा हिस्सा खर्च होतो. बदलते हवामान आणि दीर्घकाळ टिकणारी आर्द्रता यामुळे या रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने दीर्घकाळ संरक्षण देणाऱ्या उपायांची आवश्यकता वाढली आहे. कंपनीच्या माहितीनुसार, 'झिवाना™ स्मार्ट'ची आधुनिक कार्यपद्धती ऊमायसीट रोगांविरुद्ध प्रभावी ठरते. पावसाळी वातावरणातही हे उत्पादन सरासरी ७ ते १४ दिवसांपर्यंत संरक्षण देऊ शकते. पावसाचा परिणाम कमी होणे तसेच आधीची पाने आणि नव्याने होणारी वाढ या दोन्हींचे संरक्षण करण्याच्या क्षमतेमुळे संपूर्ण पीक चक्रात रोगांचे व्यवस्थापन करणे शेतकऱ्यांना शक्य होणार आहे. बायरच्या पीक विज्ञान विभागाचे भारतातील मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन बाबू म्हणाले, "भारताच्या पोषण सुरक्षेसाठी आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी फलोत्पादन महत्त्वाचे आहे. 'झिवाना™ स्मार्ट'च्या माध्यमातून बायर विज्ञानकेंद्री नवसंशोधन आणत आहे. यामुळे फलोत्पादक शेतकऱ्यांना रोगांच्या गुंतागुंतीच्या समस्यांचे व्यवस्थापन करण्यास, पिकांची गुणवत्ता जपण्यास आणि अधिक लवचिक व शाश्वत अन्नप्रणाली उभारण्यास मदत होईल." 'झिवाना™ स्मार्ट' महाराष्ट्रासह कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान, आसाम, आंध्र प्रदेश आणि पंजाब या प्रमुख फलोत्पादक राज्यांमध्ये उपलब्ध होणार आहे. नावीन्यपूर्ण पीक संरक्षण उपायांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची उत्पादकता वाढविणे आणि शाश्वत शेतीला चालना देण्याच्या बायरच्या प्रयत्नांचा 'झिवाना™ स्मार्ट' हा पुढील टप्पा असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

# दुभंगलेले ओठ आणि टाळूच्या उपचारांसाठी आज मोफत शस्त्रक्रिया शिबिर

पुणे : (स. गांवकरी)

DPU DR. D.Y. PATIL MEDICAL COLLEGE HOSPITAL & RESEARCH CENTRE PIMPRI, PUNE

पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र येथे जन्मतः दुभंगलेले व फाटलेले ओठ तसेच टाळू या व्यंगाने ग्रस्त बालकांसाठी मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शुक्रवार, दि. 7 ऑगस्ट 2026 रोजी "मिशन स्माईल आणि कोटक महिंद्रा" यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार आहे. हे शिबिर डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयाच्या हाय-टेक इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील पुनर्रचनात्मक (प्लास्टिक) शल्यचिकित्सा विभागातील बाह्यरुग्ण विभाग, OPD क्र. 5 A येथे सकाळी 9 ते दुपारी 4 या वेळेत होणार आहे. जन्मतः दुभंगलेले व फाटलेले ओठ तसेच टाळू असलेल्या बालकांना योग्य उपचार मिळावेत, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. शिबिरात तपासणी झालेल्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी आंतररुग्ण विभागात दाखल केले जाईल. तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, सर्व प्रयोगशाळा चाचण्या, शस्त्रक्रिया, शस्त्रक्रियेनंतरची काळजी आणि आवश्यक औषधे या सर्व सेवा पूर्णपणे मोफत पुरवण्यात येणार आहेत. याशिवाय, रुग्ण आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या एका नातेवाईकाच्या राहण्याची व जेवणाचीही मोफत सोय करण्यात आल्यामुळे गरजू कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळणार आहे. फाटलेले ओठ व टाळू यांसारख्या व्यंगांमुळे अनेक बालकांना शारीरिक, मानसिक आणि सामाजिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा बालकांना नवसंजीवनी देत त्यांचे आरोग्य सुधारावे आणि त्यांच्या चेहऱ्यावर विश्वासपूर्ण हास्य फुलावे, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

# पुण्यात होणार 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचारवेध साहित्य संमेलन'



पुणे : (स. गांवकरी)

पद्मपाणी फाउंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कर्मचारी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचारवेध साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदी ज्येष्ठ लेखिका आणि विचारवंत डॉ. प्रज्ञा दया पवार यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. आयोजकांनी केलेल्या नम्र विनंतीला मान देऊन डॉ. प्रज्ञा दया पवार यांनी या संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारण्यास आपला सहर्ष होकार दिला आहे, अशी माहिती संमेलनाचे संयोजन समिती अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी प्रेस नोटद्वारे प्रसिद्धीस दिली आहे. हे विशेष वैचारिक साहित्य संमेलन आगामी १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसर येथे संपन्न होणार आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुरोगामी, विद्रोही आणि कष्टकरी जनतेच्या हक्कांच्या विचारांचा वेध घेणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. संमेलनाचे संयोजन समिती अध्यक्ष राहुल डंबाळे यावेळी म्हणाले, "लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे 'जग बदल घालूनी घाव, सांगूनी गेले मज भीमराव' हे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत. डॉ. प्रज्ञा दया पवार यांचे मराठी साहित्य क्षेत्रातील योगदान आणि त्यांची सामाजिक जाणीव अत्यंत प्रगल्भ आहे. त्यांच्यासारख्या खंबीर आणि ज्येष्ठ विचारवंताचे नेतृत्व या संमेलनाला लाभल्यामुळे या वैचारिक सोहळ्याची उंची आणि समृद्धी अधिक वाढणार आहे."

या संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजन समितीचे प्राज्ञ वैशाली देठे, डॉ. राहुल ससाणे, सतिष वाघमारे आणि संतोष मदने हे विशेष परिश्रम घेत आहेत.

संमेलनामध्ये विविध वैचारिक सत्रांचे, परिसंवादांचे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला पुणे शहर व महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते, साहित्यिक, अभ्यासक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तरी सर्व साहित्यप्रेमींनी आणि नागरिकांनी या संमेलनाला बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पद्मपाणी फाउंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कर्मचारी संघाच्या वतीने करण्यात आले आहे. 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचारवेध साहित्य संमेलना'च्या नवनियुक्त अध्यक्षा डॉ. प्रज्ञा दया पवार या मराठी साहित्य क्षेत्रातील एक आघाडीच्या, ख्यातनाम कवयित्री, कादंबरीकार, ललित लेखिका आणि प्रखर विचारवंत म्हणून सुपरिचित आहेत. मराठी साहित्यातील दलित, विद्रोही आणि स्त्रीवादी चळवळीत त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते.

डॉ. प्रज्ञा पवार यांनी आपल्या लेखनातून नेहमीच सामाजिक विषमता, शोषितांचे प्रश्न आणि स्त्रियांच्या हक्कांवर सडेतोड भाष्य केले आहे. त्यांचे 'अंतस्थ', 'उत्कट शब्दवेध', 'मी भिडवू इच्छितेय समोरासमोर डोळे' आणि 'आरपारं' यांसारखे काव्यसंग्रह प्रचंड गाजले आहेत. काव्याव्यतिरिक्त 'धादांत खैरलांजी' (दीर्घ कविता), 'केंद्रांकित' (ललित लेखसंग्रह) आणि 'मातीचा पोत' यांसारख्या वैचारिक व ललित साहित्यातून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

### वैचारिक भूमिका

महाराष्ट्रातील पुरोगामी, आंबेडकरी आणि समतावादी चळवळींमध्ये डॉ. प्रज्ञा पवार यांचा नेहमीच सक्रिय सहभाग राहिला आहे. चळवळीतील एक खंबीर आणि विवेकी आवाज म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून त्यांची झालेली निवड ही अण्णा भाऊ साठे यांच्या पुरोगामी आणि क्रांतिकारी विचारांना अधिक गती देणारी ठरेल.

# थोडक्यात पण महत्वाचे




## सुजय प्रतिष्ठान तर्फे भव्य रक्तदान शिबिर, सन्मान सोहळ्याचे आयोजन

पुणे (स. गांवकरी) : सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानासारख्या जीवनदायी कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्याच्या उद्देशाने सुजय प्रतिष्ठान, मैत्री रक्ताची यांच्या वतीने कै. सुजय सुरेश सकपाळ यांच्या १३ व्या स्मृतीप्रित्यर्थ भव्य रक्तदान शिबिर, आयुर्वेदिक आरोग्य तपासणी शिबिर व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत उद्यान मंगल कार्यालय, खजिना विहीर चौक, सदाशिव पेठ, पुणे येथे संपन्न होणार आहे.अशी माहिती पत्रकार परिषदेत सुजय प्रतिष्ठानचे संस्थापक मा. श्री. सुरेश ग. सकपाळ यांनी दिली. पुणे श्रमिक पत्रकार भवन ला झालेल्या पत्रकार परिषदेत श्री. किसन भोसले – (प्रसिद्ध उद्योजक),डॉ. विठ्ठल जाधव (IPS– विशेष पोलीस महानिरीक्षक सेवानिवृत्त), श्री सुनील मोरे,श्री हेमंत सोनवणे,श्री सागर भंडारी,श्री हरिभाऊ सपकाळ,श्री. सुधीर सकपाळ – (संस्थापक, सुजय प्रतिष्ठान – मैत्री रक्ताची), उपस्थित होते. या उपक्रमात नागरिकांसाठी भव्य रक्तदान शिबिर, मोफत आयुर्वेदिक आरोग्य तपासणी, अल्पदरात आयुर्वेदिक औषधांचे वितरण तसेच मोफत कांस्यथाळी मसाज यांची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळू शकते. त्यामुळे युवकांसह सर्व नागरिकांनी या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## बापगाव-सावद-वाशेरे-पडघे मार्गाची दुरवस्था; खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी तालुक्यातील बापगाव-सावद-आमने-वाशेरे-पडघे या महत्त्वाच्या मार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून संपूर्ण रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालक व प्रवाशांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात या मार्गावरील परिस्थिती अधिकच गंभीर बनली असून, खड्ड्यांमुळे वाहतूक संथ झाली आहे. "रस्त्यात खड्डे की खड्ड्यांत रस्ता" अशी परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या रस्त्यावर लाखो रुपयांचा खर्च करण्यात आला असल्याचा दावा केला जात असला, तरी निकृष्ट दर्जाच्या कामामुळे प्रत्येक पावसाळ्यात पुन्हा खड्डे पडत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. विशेषतः दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी, नोकरदार व मालवाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अपघाताची भीती कायम आहे. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन दर्जेदार पद्धतीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी कॉम्रेड रमेश गायकवाड यांनी केली आहे. येत्या आठवड्यात या रस्त्याच्या प्रश्नावर जाहीर आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला आहे. तसेच या मार्गाच्या दुरवस्थेबाबत नागरिकांनी मोठ्या संख्येने 'आपले सरकार' पोर्टलवर तक्रारी नोंदवून प्रशासनावर दबाव आणावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## पुण्याच्या मंगेश लोहोर यांची आंतरराष्ट्रीय सुवर्णकामगिरी



पुणे (स. गांवकरी) : पुण्यातील 'फ्लाइंग सिझर युनिसेक्स सलून अँड अकॅडमी'चे संचालक आणि आंतरराष्ट्रीय हेअर स्टायलिस्ट मंगेश (यश) लोहोर यांनी थायलंडमधील बँकॉक येथे आयोजित प्रतिष्ठित 'मॅट्रिक्स प्रो – हेअर ट्रान्सफॉर्मर २०२६' स्पर्धेत विजेतेपद पटकावत पुण्यासह भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. 'एमएचटी मेन्स कलर अँड कट २०२६' प्रकारातील या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतातील हजारो हेअर स्टायलिस्टनी सहभाग घेतला होता. उपांत्य फेरीत संपूर्ण पुण्यातून केवळ मंगेश लोहोर यांची निवड झाली होती. त्यानंतर अंतिम फेरीत आधुनिक केशरचना, आकर्षक हेअर कलर ट्रान्सफॉर्मेशन आणि उत्कृष्ट तांत्रिक कौशल्याचे प्रदर्शन करत त्यांनी परीक्षकांची मने जिंकली आणि विजेतेपदावर आपले नाव कोरले. 'मॅट्रिक्स प्रोफेशनल'तर्फे आयोजित या स्पर्धेतील विजेत्यांची निवड आलिम हकीम, सॅम जेम्स, विपुल चुडासमा, मेलरॉय डिक्सन आणि बिनायफर पार्डीवाला या नामांकित परीक्षकांच्या उपस्थितीत करण्यात आली.

## बचत खात्यांच्या शृंखलेत वाढ

नवी दिल्ली (स. गांवकरी) : एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे दोन नवीन सेव्हिंग्ज अकाऊंट्सची सुरुवात केल्याची घोषणा केली. 'मॅक्स फॉर सिनियर्स' आणि 'मॅक्स फॉर हर' अशी ही दोन उत्पादने असून याचा लाभ अनुक्रमे वरिष्ठ नागरिक आणि महिलांसाठी होणार आहे. विशिष्ट विभागांसाठी ही उत्पादने त्यांच्या महत्त्व पूर्ण अशा सेव्हिंग्ज मॅक्स श्रेणीतील असून ही श्रेणी प्रेफर्ड एन्ट्री लेव्हल सेव्हिंग्ज अकाऊंट्स पैकी असतील. नुकत्याची पीआयबीच्या रिपोर्ट नुसार भारतातील वरिष्ठ नागरिकांची लोकसंख्या ही २०३६ पर्यंत २३० दशलक्षांवर पोहोचणार आहे, म्हणजेच संपूर्ण लोकसंख्येच्या १५ टक्के ही आकडेवारी असेल. त्याच बरोबर सध्या महिला या एकूण बँक अकाऊंट्स पैकी ३९.२ टक्के खातेधारक आहेत, ही आकडेवारी एकूण ठेवींच्या ३९.७ टक्के आहे. मॅक्स फॉर सिनियर्स आणि मॅक्स फॉर हर चे डिझाईन हे या विभागातील ग्राहकांच्या सातत्याने बदलत्या गरजा पूर्ण करण्यासह क्षेत्रातील पहिले वैशिष्ट्य जसे सायबर फ्रॉड कव्हर, १ लाख रुपयांपर्यंत हॉस्पिटलायझेशन कव्हर आणि अन्य सुविधा यामध्ये देण्यात येत आहेत.

## सनकाइंड इंडियाला २५० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या ऑर्डर्स

पुणे (स. गांवकरी) : एकात्मिक नवीकरणीय ऊर्जा ईपीसी आणि स्वच्छ ऊर्जा उपाय पुरवणाऱ्या सनकाइंड इंडिया लिमिटेडला आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मोठे यश मिळाले आहे. कंपनीला जुलै २०२६ पर्यंत सुमारे २५० मेगावॅट क्षमतेच्या वितरित मुक्त प्रवेश (डिस्ट्रीब्युटेड ओपन ॲक्सेस) सौर ऊर्जा प्रकल्पांच्या अनेक ईपीसी ऑर्डर्स प्राप्त झाल्या आहेत. हे प्रकल्प छत्तीसगड, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये उभारले जाणार असून, स्टील, पॅकेजिंग, उत्पादन उद्योग तसेच स्वतंत्र वीज उत्पादक क्षेत्रातील व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांसाठी ते राबवले जाणार आहेत. या ऑर्डर्समुळे कंपनीचे ऑर्डर बुक आणि देशभरातील अंमलबजावणीची क्षमता अधिक बळकट झाली आहे.

# बालविकास, महिला सक्षमीकरणात प्रत्येकाचे योगदान गरजेचे

### अमृता देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन; ग्रॅव्हिट्स फाउंडेशनतर्फे ऊर्जा पुरस्कारांचे वितरण

पुणे : (स. गांवकरी)



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, आहिल्याबाई होळकर, झाशीची राणी यांसारख्या महिलांनी आपल्या कतृत्वाने देशासाठी मोठे योगदान दिले. आजच्या काळातही असे काम करणाऱ्या महिलांची मोठ्या प्रमाणात गरज आहे. बालविकास व महिला सक्षमीकरणासाठी केवळ प्रशासन पुरेसे नाही. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेऊन योगदान द्यायला हवे. प्रत्येकाने आपापल्या क्षमतेनुसार महिला, लहान मुले, पर्यावरण, सामाजिक क्षेत्रात काही ना काही चांगले काम करायला हवे, असे प्रतिपादन दिव्यज फाउंडेशनच्या संस्थापिका अमृता देवेंद्र फडणवीस यांनी केले.

ग्रॅव्हिट्स फाउंडेशन आयोजित ऊर्जा पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. सेनापती बापट रस्त्यावरील हॉटेल जेडब्ल्यू मॅरियट येथे आयोजित कार्यक्रमावेळी ग्रॅव्हिट्स फाउंडेशनच्या संस्थापिका उषा काकडे, डॉ. शां. ब मुजुमदार, सिम्बायोसिस अभिमत विद्यापीठाच्या कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, लोकमंगल फाऊंडेशनचे विश्वस्त रोहन देशमुख, प्रसिद्ध क्रिकेटपटू तिलक वर्मा, प्रसिद्ध अभिनेते चंकी पांडे, तेलगु चित्रपटसृष्टीतील दिग्दर्शक व्यंकटेश (व्यंकी) कुडुमुला आदी उपस्थित होते.

शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे संस्थापक पद्मभूषण डॉ. शां. ब. मुजुमदार यांना यंदाचा 'उर्जा जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. संजय गुप्ते (विशेष आरोग्यसेवा), कायनेटिक ग्रीन एनर्जीच्या संस्थापिका सुलज्जा फिरोदिया मोटवानी (उद्योजकता), भारतीय क्रिकेटपटू तिलक वर्मा (क्रीडा), लोकसाहित्य आणि सत्यशोधक चळवळीचे व्यासंगी अभ्यासक प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे (साहित्यसेवा), सोलापूर येथील जिव्हाळा मतिमंद संस्थेचे प्रमुख अण्णाराव भिमशंकर राजमाने (शिक्षण व समाजसेवा) यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले. याबरोबरच उरी हल्ल्यातील शहीद जवान अर्जुन जाधव यांच्या स्मरणार्थ वीरपत्नी सायली अर्जुन जाधव व त्यांच्या आई वडीलांनाही शौर्य पुरस्काराने विशेष सन्मानित करण्यात आले. माळशिरस दुर्घटनेतील पाच जणांचा जीव वाचवणाऱ्या तांदुळवाडी येथील इरफान मुजावर यांना मानवतावादी पुरस्कार दिला. सन्मानचिन्ह, शाल, तुळशीचे रोप असे या पुरस्काराचे स्वरुप होते.

# २७४ फरार आरोपींना अटक : मालमत्ता जप्त

नवी दिल्ली : (स. गांवकरी)



एकेकाळी भारतात अशी धारणा होती की, आर्थिक गुन्हा करून परदेशात पळून गेलेले आरोपी पुन्हा कधीच कायद्याच्या ताब्यात येणार नाहीत. मोठमोठ्या घोटाळ्यांतील आरोपी अनेक वर्षे परदेशात सुरक्षित राहत असत आणि भारतीय तपास यंत्रणा त्यांना परत आणण्यासाठी प्रतीक्षा करत असल्याचे चित्र दिसत असे. मात्र, गेल्या काही वर्षांत ही परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. आता संदेश स्पष्ट आहे—गुन्हा भारतात झाला असेल आणि आरोपी जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात लपला असला, तरी कायदा त्याचा पाठलाग सोडणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृहमंत्री तथा सहकारमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली फरार आर्थिक गुन्हेगार कायदा (Fugitive Economic Offenders Act) प्रभावीपणे राबविण्यात आला. या व्यापक धोरणाअंतर्गत २०१९ पासून आतापर्यंत ३६ देशांतून २७४ फरार आरोपींना भारतात परत आणण्यात आले असून, १७,८७४ कोटी किमतीच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. ही केवळ आकडेवारी नसून, राजकीय इच्छाशक्ती आणि ठाम निर्णयक्षमतेचे उदाहरण असल्याचे सांगितले जाते. सामान्य नागरिकाच्या दृष्टीने पाहिले, तर सर्वात मोठा बदल सरकारच्या दृष्टिकोनात दिसून येतो. यापूर्वीच्या सरकारांमध्ये फरार आरोपींना भारतात परत आणण्यासाठी आवश्यक राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याची टीका केली जात होती. फरार आरोपींना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी अमित शाह यांनी गृह मंत्रालयाच्या कामकाजात एकात्मिक, गुप्तचर माहितीवर आधारित आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारे मॉडेल विकसित करण्यावर भर दिला.

# सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसमुळे करिअरची नवी संधी

मुंबई : (स. गांवकरी)

- राज्यातील एक हजारांहून अधिक तरुणांना प्रशिक्षण; देशभरात २६,५०० युवक-युवतींना भविष्यकालीन तंत्रज्ञानाचे धडे

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राचा झपाट्याने विस्तार होत असताना या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या महाराष्ट्रातील तरुणींना व्यावहारिक तंत्रज्ञान कौशल्ये आणि प्रत्यक्ष प्रकल्पांचा अनुभव देण्यासाठी 'सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस' महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील एक हजारांहून अधिक तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले असून, देशभरात आतापर्यंत २६ हजार ५०० हून अधिक युवक-युवतींना प्रशिक्षण मिळाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे विविध उद्योगांमधील कामाचे स्वरूप बदलत असून नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे या क्षेत्रासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ तयार करण्याबरोबरच तरुण महिलांना तंत्रज्ञान क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी सक्षम करण्यावर सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसच्या माध्यमातून भर दिला जात आहे. उद्योगांच्या गरजांशी सुसंगत कौशल्ये, प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षण आणि वास्तविक प्रकल्पांवर काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमातून दिली जाते. नवी मुंबईतील रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची विद्यार्थिनी हिमांशी शर्मा हिच्यासाठी हा कार्यक्रम शिक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता उद्योगातील प्रत्यक्ष काम यांच्यातील महत्त्वाचा दुवा ठरला. कार्यक्रमातील प्रशिक्षण आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून तिने 'करिअरस्टॅक एआय' ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित रेझ्युमे विश्लेषण प्रणाली विकसित केली.

# वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांचा 'सोशल मीडिया'वरही वॉच

### येरवडा कारागृहाच्या भिंतीजवळ फटाके फोडून आरोपीचा वाढदिवस साजरा करणाऱ्यावर कारवाई

पुणे : (स. गांवकरी)



गुन्हेगारांचे उदात्तीकरण करणारे व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात येरवडा पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. येरवडा मध्यवर्ती कारागृहात असलेल्या आरोपीच्या वाढदिवसानिमित्त कारागृहाच्या संरक्षण भिंतीजवळ फटाके फोडून त्याचे उदात्तीकरण केल्याप्रकरणी एका आरोपीला येरवडा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

येरवडा कारागृहासारख्या अतिसंवेदनशील परिसरात कायदा-सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या प्रकारांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका गित्ते यांनी घेतली आहे. प्रत्यक्ष रस्त्यावरील गुन्हेगारीबरोबरच समाजमाध्यमांच्या माध्यमातून गुन्हेगारांची प्रतिमा मोठी करण्याचा किंवा त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवरही येरवडा पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार येरवडा कारागृह परिसरात पोलिसांकडून सतर्क गस्त सुरू होती. ४ ऑगस्ट रोजी तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक किशोर बेरड आणि त्यांचे पथक गस्त घालत असताना, एका गुन्ह्यात पाहिजे असलेला शंकर बाळासाहेब भालके (वय १९, रा. धनकवडी, पुणे) हा पोस्ट ऑफिस चौकात येणार असल्याची माहिती गोपनीय बातमीदाराकडून मिळाली. त्यानुसार पथकाने तातडीने सापळा रचून भालके याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता येरवडा मध्यवर्ती कारागृहात असलेल्या सुलतान सय्यद याच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या मित्रांनी कारागृहाच्या संरक्षण भिंतीलगत फटाके फोडल्याची माहिती समोर आली. फटाके फोडताना वाहतुकीला अडथळा निर्माण करण्यात आला तसेच नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होईल अशा पद्धतीने हा प्रकार करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

इतकेच नव्हे, तर या प्रकाराचे चित्रीकरण करून संबंधित व्हिडीओ मित्रांच्या इन्स्टाग्राम खात्यांवर प्रसारित करण्यात आले. कारागृहात असलेल्या आरोपीच्या गुन्हेगारीचे उदात्तीकरण करण्याच्या उद्देशाने हा प्रकार केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्रेया कालरा 'लॉक अप: सच या सजा' ची विजेती

नवी दिल्ली : (स. गांवकरी)




सत्य खरंच तुम्हाला मुक्त करू शकतं. लॉक अप: सच या सजा या नेटफ्लिक्सच्या कैद रिॲलिटी शोमध्ये हे अक्षरशः सिद्ध झालं, ज्याने पहिल्या दिवसापासूनच प्रेक्षकांना खिळवून ठेवलं. सहा आठवड्यांच्या भावनिक कबुलीजबाब, चार्जशीट्स, स्फोटक वाद, बदलणारे समीकरण आणि अविस्मरणीय रिडेम्प्शन आर्क्सनंतर नेटफ्लिक्स आणि बालाजी टेलिफिल्म्सच्या रेकॉर्डब्रेकिंग कैद रिॲलिटी फिनॉमेननला विजेती मिळाली. कैदी श्रेया कालरा विजयी ठरली, तिने सीझनमधील सर्वात कठीण टास्क्स, सततची चौकशी आणि बदलणारे समीकरण पार करत दाखवले की तिची खरी ताकद म्हणजे प्रामाणिकपणा. लॉक अप मध्ये एका व्यक्ती म्हणून प्रवेश करून, सत्य स्वीकारत बाहेर पडण्याचा तिचा प्रवास देशभरातील प्रेक्षकांना भिडला आणि अखेरीस तिला विजेतेपद मिळवून दिलं.

कैद रिॲलिटी फॉरमॅट म्हणून सुरू झालेला हा शो लवकरच भारतातील सर्वाधिक चर्चेतला शो ठरला, एक वेड म्हणावं असं. 27 जून रोजी पाच दिवसांच्या आठवड्याच्या सीरिज म्हणून प्रीमियर झालेला लॉक अप: सच या सजा अभूतपूर्व यशस्वी ठरला. प्रेक्षकांच्या मागणीनुसार तो आधी सहा दिवसांवर विस्तारला आणि अखेरीस आठवड्याचे सातही दिवस स्ट्रीम होऊ लागला. फक्त तीन आठवड्यांत या सीरिजने 50 मिलियन व्ह्यूइंग अवर्स पार केले, तर शोभोवतीच्या चर्चांनी सोशल मीडियावर स्फोट घडवला, आजपर्यंत 3.3 बिलियन सोशल मीडिया व्ह्यूज आणि 5 मिलियन संभाषणं निर्माण केली. हिट सीरिजपेक्षा अधिक, लॉक अप: सच या सजा एक सांस्कृतिक फिनॉमेनन ठरला. सोळा कैदी राम कपूर, शिवांगी जोशी, धीरज धूपर, हर्षद चोपडा, शिल्पा शिंदे, सुनीता आहुजा, पामाला सेरेना, माधुरी ग्रोवर, श्रेस्ता अय्यर, आकांक्षा चमोला, आकांक्षा चौधरी, योगेश रावत, सूफी मोटीवाला, श्रेया कालरा, वरुण यादव आणि रियाज अली एका ध्येयाने लॉक अप मध्ये प्रवेश केला. त्यांच्या वन-लायनर्स इंटरनेटवर कॅचफ्रेज झाले; त्यांच्या स्पर्धा अनंत चर्चांना कारणीभूत ठरल्या; आणि प्रत्येक चार्जशीट, कबुलीजबाब व एव्हिक्शन सोशल मीडिया टाइमलाइन्सवर वर्चस्व गाजवत राहिले. रितेश देशमुख आणि फराह खान यांनी या कैद्यांचं आणि त्यांच्या नखऱ्यांचं व्यवस्थापन उत्कृष्टपणे केलं. मित्र म्हणून त्यांच्यासोबत राहणं, त्यांना समज देणं आणि प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करणं या दोन्ही जेलर्सनी आपली उपस्थिती ठळकपणे जाणवून दिली आणि शोला मोठी किंमत वाढवून दिली. शेवटी एका कैद्याने आपली क्षमता सिद्ध केली आणि विजेतेपदाची ट्रॉफी उचलली. श्रेया कालरा म्हणाली, "लॉक अप: सच या सजा मधला अनुभव मला कायमचा बदलून गेला. मी इथे परफेक्ट होण्यासाठी आले नव्हते, मी खरी राहण्यासाठी आले होते. प्रामाणिक राहणं मला आज विजेती बनवलं आणि हा माझ्या आयुष्यातला सर्वात अभिमानाचा क्षण आहे. लोकांनी मला मोठ्या आवाजात बोलणारी, वादग्रस्त आणि कठीण म्हटलं, पण मी कधीच स्वतःला बदललं नाही. ही ट्रॉफी त्या सगळ्यांची आहे ज्यांना सत्य बोलल्यामुळे न्याय करण्यात आलं. माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सगळ्यांचे आभार. ही फक्त सुरुवात आहे. नेटफ्लिक्स आणि एकता मॅडम यांचे मी मनापासून आभार मानते की त्यांनी मला माझं खरं रूप जगासमोर मांडण्याचं व्यासपीठ दिलं."

# १९ ऑगस्टपासून नवी दिल्लीत 'इंडियन डीजे एक्स्पो-२०२६'

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

- ५०० हून अधिक जागतिक ब्रँड्सचा सहभाग
- व्यावसायिक ध्वनी, प्रकाशयोजना, दृकश्राव्य प्रणालींसह अत्याधुनिक मनोरंजन तंत्रज्ञानाची तीन दिवसीय मेजवानी

मनोरंजन तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतातील प्रतिष्ठित आणि बहुप्रतिक्षित 'इंडियन डीजे एक्स्पो-२०२६'चे आयोजन १९ ते २१ ऑगस्ट २०२६ दरम्यान भारत मंडपम, प्रगती मैदान, नवी दिल्ली येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनाची ही ११ वी आवृत्ती असून, व्यावसायिक ध्वनी प्रणाली, प्रकाशयोजना, दृकश्राव्य तंत्रज्ञान, वाद्ये, डीजे तंत्रज्ञान, एलईडी डिस्प्ले आणि विशेष दृश्य-ध्वनी प्रभाव क्षेत्रातील देशातील प्रमुख व्यावसायिक व्यासपीठ म्हणून या प्रदर्शनाची ओळख निर्माण झाली आहे. यंदाच्या प्रदर्शनात ५०० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आघाडीचे ब्रँड्स सहभागी होण्याची अपेक्षा आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण उत्पादने आणि भविष्याभिमुख तांत्रिक उपायांच्या माध्यमातून भारतातील मनोरंजन आणि सिस्टिम इंटिग्रेशन उद्योगात वेगाने होत असलेल्या बदलांची झलक या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे. यंदा 'प्रो एव्ही सिस्टिम्स इंटिग्रेशन एक्स्पो-२०२६'चेही याच ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. वाढत्या इन्स्टॉलेशन आणि सिस्टिम इंटिग्रेशन बाजारपेठेवर यामध्ये विशेष भर दिला जाणार आहे. कमर्शियल ऑडिओ, इन्स्टॉल्ड साउंड, साउंड रिइन्फोर्समेंट, कॉन्फरन्सिंग प्रणाली, डिजिटल सायनेज, एलईडी डिस्प्ले तंत्रज्ञान आणि इंटेलिजंट लाइटिंगसह विविध अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे सादरीकरण येथे होणार आहे.

# जागतिक स्तनपान सप्ताह : माता आणि बाळाच्या निरोगी भविष्यासाठीस्तनपानाचे महत्त्व

- डॉ. नूतन वंजारे या मेडिकव्हर हॉस्पिटल, पुणे MBBS, MS (OBGY), FMAS

पुणे : (स. गांवकरी)




दरवर्षी १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत जागतिक स्तनपान सप्ताहसाजरा केला जातो. नवजात बाळाच्या निरोगी वाढीसाठी, योग्य पोषणासाठीआणि मातांच्या आरोग्यासाठी स्तनपानाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंतपोहोचविणे हा या सप्ताहाचा प्रमुख उद्देश आहे. स्तनपानाबाबत योग्यमाहिती, वेळेवर वैद्यकीय मार्गदर्शन आणि कुटुंबाचा आधार मिळाल्यास माताआणि बाळाच्या आरोग्यासाठी सकारात्मक परिणाम होऊ शकतात.

मेडिकव्हर हॉस्पिटल, पुणे येथील प्रसूती व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. नूतन वंजारेयांनी सांगितले की, "आईचे दूध हे नवजात बाळासाठी नैसर्गिक आणिमहत्त्वपूर्ण पोषणाचे स्रोत आहे. त्यामध्ये बाळाच्या वाढीसाठी आवश्यकपोषक घटक असतात. स्तनपानामुळे बाळाची रोगप्रतिकारक शक्तीविकसित होण्यास मदत होते आणि विविध संसर्गांपासून संरक्षणमिळण्यासही हातभार लागू शकतो."

जन्मानंतरच्या सुरुवातीच्या काळात बाळाला योग्य पद्धतीने आणिनियमितपणे स्तनपान देणे महत्त्वाचे असते. स्तनपानामुळे बाळाची शारीरिकआणि मानसिक वाढ होण्यास मदत होते. तसेच आई आणि बाळामधीलभावनिक नाते अधिक दृढ होण्यासही मदत होते.

स्तनपानाचा लाभ केवळ बाळालाच नव्हे, तर मातेलाही होतो. स्तनपानामुळेप्रसूतीनंतर शरीराच्या नैसर्गिक पुनर्प्राप्ती प्रक्रियेला मदत होऊ शकते. अनेकमातांसाठी हा काळ शारीरिक आणि भावनिक बदलांचा असतो. त्यामुळेनवमातेला पुरेशी विश्रांती, संतुलित आहार, मानसिक आधार आणि कुटुंबाचेसहकार्य मिळणे अत्यंत आवश्यक आहे. "प्रत्येक आईचा स्तनपानाचा अनुभव वेगळा असू शकतो. काही मातांनाबाळाची योग्य पकड (लॅचिंग), स्तनपानाची योग्य स्थिती, दूध कमीअसल्याची चिंता किंवा स्तनांमध्ये वेदना यांसारख्या अडचणी जाणवूशकतात. अशा वेळी घाबरून न जाता किंवा अप्रमाणित माहितीवर अवलंबूनन राहता प्रसूती व स्त्रीरोग तज्ज्ञ किंवा प्रशिक्षित आरोग्य तज्ज्ञांचा सल्लाघेणे महत्त्वाचे आहे," असे डॉ. वंजारे यांनी सांगितले. स्तनपानाबाबतचे योग्य मार्गदर्शन गर्भावस्थेपासूनच मिळणे उपयुक्त ठरते. गर्भवती महिलांना स्तनपानाचे फायदे, प्रसूतीनंतर स्तनपान कसे सुरू करावे, बाळाला योग्य प्रकारे कसे धरावे आणि स्तनपानादरम्यान कोणती काळजीघ्यावी, याविषयी माहिती देणे आवश्यक आहे.

# एसुसने 'क्रोमबुक सीएक्स15' केला लाँच

पुणे : (स. गांवकरी)




तैवानची आघाडीची तंत्रज्ञान कंपनी एसुसने भारतातील आपल्या क्रोमबुक उत्पादन श्रेणीचा विस्तार करत नवीन एसुस क्रोमबुक सीएक्स15 (सीएक्स1505सीटीए) सादर केला आहे. विद्यार्थी, युवा व्यावसायिक आणि प्रथमच लॅपटॉप खरेदी करणाऱ्या ग्राहकांना लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेल्या या लॅपटॉपमध्ये क्रोमओएस, गुगल एआय आणि सुरक्षित क्लाउड-आधारित संगणकीय अनुभवाची सुविधा देण्यात आली आहे.

या लॅपटॉपची किंमत ₹47,990 असून तो एसुस एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स, आरओजी स्टोअर्स, अधिकृत विक्रेते, रिलायन्स डिजिटल, एसुस ई-शॉप आणि देशभरातील प्रमुख रिटेल स्टोअर्समध्ये उपलब्ध असेल.

क्रोमओएसवर आधारित असलेला एसुस क्रोमबुक सीएक्स15 हा हलक्या आणि मजबूत डिझाइनसह विश्वासार्ह कार्यक्षमता, स्मार्ट उत्पादकता, दर्जेदार मनोरंजन आणि एंटरप्राइझ-स्तरीय सुरक्षा प्रदान करतो. गुगलच्या परिसंस्थेशी सहज जोडणीमुळे संशोधन, ऑनलाइन शिक्षण, सादरीकरणे तयार करणे आणि टीमसोबत सहयोग करणे यांसारखी दैनंदिन कामे अधिक सुलभ होतात. या लॅपटॉपमध्ये गुगलच्या नव्या एआय सुविधांचा समावेश करण्यात आला असून, वापरकर्त्यांना अधिक कार्यक्षमतेने काम करण्याबरोबरच भविष्यातील गरजांसाठी उपयुक्त एआय कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळते.

# पर्यावरण संवर्धनात प्रत्येकाने योगदान द्यायला हवे : डॉ. अरविंद नातू




पुणे : (स. गांवकरी)

"पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकार किंवा संस्थांची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनातून त्यात योगदान देणे आवश्यक आहे. पर्यावरणीय समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्यासाठी वैयक्तिक पातळीपासून सुरुवात होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थेचे (आयसर) सल्लागार डॉ. अरविंद नातू यांनी केले. शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी विकसित केलेल्या 'आर-९ पॉइंट प्रोग्राम'ची माहितीही त्यांनी दिली. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्चच्या वतीने आयोजित 'सूर्य ग्रीन अर्थ अवॉर्ड्स २०२६' वितरण सोहळ्यात डॉ. अरविंद नातू बोलत होते. 'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमधील बन्सी-रत्न सभागृहात आयोजित कार्यक्रमात कायनेटिक कम्युनिकेशन्स लिमिटेडचे संचालक डॉ. दीपक शिकारपूर, 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, डॉ. सारिका झांबड आदी उपस्थित होते. यावेळी पर्यावरण आणि शाश्वत विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना 'सूर्य ग्रीन अर्थ अवॉर्ड २०२६'ने सन्मानित करण्यात आले. मेधा ताडपत्रीकर, डॉ. राहुल मराठे, डॉ. श्वेता लोखंडे, शिल्पा भालेराव, प्राची शेवगावकर, डॉ. किरण वैद्य यांना पुरस्कार देण्यात आला. मानपत्र, सुवर्णपदक व 'सूर्यदत्त'चे उपरणे देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "पर्यावरणाचे संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपण पर्यावरणाचे मालक नाही, तर त्याचे केवळ विश्वस्त आहोत. त्यामुळे पर्यावरणाचे जतन, संवर्धन आणि समृद्धीकरण करण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे, जेणेकरून ही अमूल्य नैसर्गिक संपदा आपण पुढील पिढ्यांकडे सुरक्षितपणे सुपूर्द करू शकू." डॉ. दीपक शिकारपूर यांनी हरित माहिती तंत्रज्ञान (ग्रीन आयटी) आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यावरण संवर्धनास चालना देण्याची गरज व्यक्त केली. तसेच पाणीटंचाईसारख्या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.



ठाणे : पावसाळा सुरू होऊन महिनाही उलटला नाही तोच दिवा शहरात साथीच्या आजारासह डेंग्यूचा वाढता धोका निर्माण झाला आहे. दररोज तब्बल १० ते १२ डेंग्यूचे रुग्ण उपचारासाठी येत असल्याची माहिती दिवा शहरातील स्थानिक डॉक्टर्स कडून येत आहे. त्यामुळे दिवेकरांनी आता आरोग्याची विशेष काळजी घेण्याची गरज निर्माण झाली आहे. डेंग्यूची लागण झाल्यानंतर १०२ ते १०४°F पर्यंत अचानक ताप, तीव्र डोकेदुखी, डोळ्यांच्या मागे दुखणे, अंगदुखी-सांधेदुखी, मळमळ, उलट्या तसेच त्वचेवर लाल पुरळ अशी लक्षणे दिसू शकतात. ही लक्षणे जाणवल्यास दुर्लक्ष न करता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## थोडक्यात बातम्या...

### एआय+ची ₹१०० कोटींची गुंतवणूक; प्रोजेक्ट ट्रस्ट+ची घोषणा




पुणे (स. गांवकरी) : भारतीय स्मार्टफोन क्षेत्रात महत्त्वपूर्ण पाऊल टाकत एआय+ स्मार्टफोन्सने 'प्रोजेक्ट ट्रस्ट+' या नव्या उपक्रमाची घोषणा केली आहे. पुढील पाच वर्षांत दरवर्षी ₹२० कोटी, अशा एकूण ₹१०० कोटींची गुंतवणूक करून देशातील सर्वात सुरक्षित स्मार्टफोन इकोसिस्टम उभारण्याचा कंपनीचा मानस आहे. या उपक्रमांतर्गत एथिकल हॅकर्स, सुरक्षा संशोधक आणि डेव्हलपर्स यांना कंपनीच्या प्रणालींची चाचणी घेण्यासाठी, सुरक्षा त्रुटी शोधण्यासाठी आणि ग्राहकांपर्यंत पोहोचण्यापूर्वी त्या दूर करण्यासाठी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कंपनीच्या मते, 'प्रोजेक्ट ट्रस्ट+' ही केवळ बग बाऊंटी योजना नसून पारदर्शकता, सहयोग आणि सातत्यपूर्ण सुधारणा यांवर आधारित व्यापक सुरक्षा उपक्रम आहे. डिजिटल युगात सुरक्षित स्मार्टफोन तयार करण्यासाठी तंत्रज्ञान समुदायाचा सहभाग अत्यावश्यक असल्याचे एआय+ने स्पष्ट केले. याबाबत बोलताना एआय+ स्मार्टफोन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि NxtQuantum Shift Technologies चे संस्थापक माधव सेठ म्हणाले, "बहुतेक कंपन्या त्यांची उपकरणे सुरक्षित असल्याचा दावा करतात; आम्हाला ते कृतीतून सिद्ध करायचे आहे. सुरक्षा हा अंतिम टप्पा नसून सातत्याने विकसित होणारा प्रवास आहे. 'प्रोजेक्ट ट्रस्ट+'द्वारे आम्ही भारतातील तंत्रज्ञान समुदायासाठी आमचे दरवाजे खुले करत आहोत, कारण सर्वात सुरक्षित उत्पादने सामूहिक सहभागातूनच तयार होतात."

### एसुस कडून स्वातंत्र्यदिन 2026 निमित्त विशेष लॅपटॉप ऑफर्स




पुणे (स. गांवकरी) : तैवानमधील जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची कंपनी एसुस भारताच्या स्वातंत्र्यदिनाचा उत्सव विविध उत्पादनांवरील आकर्षक ऑफर्ससह साजरा करत आहे. स्वातंत्र्यदिन विशेष सेल दरम्यान ग्राहकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज एसुस लॅपटॉप्ससह आपल्या डिजिटल अनुभवाला नव्या उंचीवर नेण्याची उत्तम संधी मिळणार आहे. उच्च कार्यक्षमतेचे गेमिंग लॅपटॉप्स ते आकर्षक आणि उत्पादकता वाढविणारे प्रीमियम लॅपटॉप्सपर्यंत, एसुस आपल्या लोकप्रिय आरओजी, टीयूएफ, व्हिवोबुक आणि झेनबुक सिरीजवर आकर्षक सवलती आणि विशेष ऑफर्स देत आहे. मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध या विशेष ऑफरमध्ये ग्राहकांना एसुसच्या सर्वोत्तम कार्यक्षमतेच्या लॅपटॉप्सवर तब्बल 53% पर्यंत बचत करण्याची संधी मिळणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, उत्कृष्ट कार्यक्षमता आणि नाविन्यपूर्ण वैशिष्ट्यांनी सज्ज लॅपटॉपमध्ये गुंतवणूक करण्यासाठी ही सुवर्णसंधी ठरणार आहे. या मर्यादित कालावधीच्या ऑफर्स 16 ऑगस्टपर्यंत रिलायन्स डिजिटल, क्रोमा आणि विजय सेल्स या आघाडीच्या इलेक्ट्रॉनिक्स विक्री केंद्रांमध्ये उपलब्ध असतील. त्यामुळे ग्राहकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज एसुस लॅपटॉपवर अधिक सुलभपणे अपग्रेड करण्याची उत्तम संधी मिळणार आहे. सणासुदीच्या विशेष सवलतींसोबतच एसुस ग्राहकांना निवडक बँक कार्डांवर इन्स्टंट सवलती तसेच 12 महिन्यांपर्यंत नो-कॉस्ट ईएमआयचा लाभही मिळणार आहे. याशिवाय, या विशेष कालावधीत केवळ ₹99 पासून सुरू होणाऱ्या वॉरंटी एक्स्टेंशन प्लान्स आणि स्थानिक अपघाती नुकसान संरक्षण योजनाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, ज्यामुळे या ऑफर्स अधिक आकर्षक ठरतात.

### आर्थिक निकाल जाहीर

पुणे (स. गांवकरी) : बर्जर पेंट्सच्या आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीचे निकाल जाहीर करण्यात आले. पश्चिम आशियातील संघर्षांनंतरही महसूल आणि ऑपरेटींग नफ्यात दोन-अंकी वाढ दिसून आली. स्वतंत्र आधारावर २५ टक्क्यांहून अधिक आणि एकत्रित आधारावर २९ टक्क्यांहून अधिक वाढीसह करोत्तर नफ्यामध्ये (पीएटी) प्रबळ वाढ दिसून आली. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी ऑपरेशन्समधून मिळालेला महसूल ३,५८३.८ कोटी रूपये होता, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या याच तिमाहीतील ३,२००.८ कोटी रूपयांच्या तुलनेत १२.० टक्के वाढ झाली. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी ईबीआयटीडीए (इतर उत्पन्न वगळून) ६०७.४ कोटी रूपये होता. ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या याच तिमाहीतील ५२८.४ कोटी रूपयांच्या तुलनेत १५.० टक्के वाढ झाली.

### लठ्ठपणावर मात करण्यासाठी बहुआयामी प्रयत्नांची गरज

पुणे (स. गांवकरी) : लठ्ठपणाला जगभरात अधिकृतरित्या एक आजार आणि प्रमुख सार्वजनिक आरोग्य समस्या म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. लठ्ठपणावर मात करण्यासाठी बहुआयामी दृष्टीकोनाची गरज असल्याचे मत विविध तज्ज्ञांनी व्यक्त केले. नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटर तर्फे नुकतेच पुण्यातील शेरटन ग्रँड हॉटेल येथे द ओबेसिटी मास्टरक्लास (360°) -डीअॅन्डओ कॉन स्पेशल एडिशन 2026 ही दोन दिवसीय वैद्यकीय परिषद पार पडली. स्थूलपणा (ओबेसिटी) व्यवस्थापन आणि मेटाबोलिक मेडिसिनमधील अत्याधुनिक संशोधन व उपचारपध्दती याबाबत चर्चा करण्यासाठी या परिषदेला भारतासह विविध देशांतील आघाडीचे एंडोक्रिनोलॉजिस्ट, फिजिशियन, बॅरिएट्रिक सर्जन, आहारतज्ञ, संशोधक आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ञ यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये 75 आंतरराष्ट्रीय तज्ञांसह 500 हून अधिक डॉक्टर्स उपस्थित होते.

## सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हजतर्फे आयोजित शिबिरात १०२ पिशव्यांचे संकलन



पुणे (स. गांवकरी)

सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज तर्फे व्हीके ग्रुपच्या वर्धापनदिनानिमित्त दीनानाथ मंगेशकर रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला कर्मचारी, स्वयंसेवक तसेच विविध संस्थांतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. व्हीके ग्रुपच्या कार्यालयात आयोजित शिबिरात १०२ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीची जाणीव जपली. यावेळी नगरसेवक पुनीत जोशी, सामाजिक कार्यकर्ते शिवराज सुतार, विश्वास कुलकर्णी, अपूर्वा कुलकर्णी, डॉ. पूर्वा केसकर, विजय साने आणि उपेंद्र देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमाचा समन्वय अमोल उंबरजे, मेघना पिंगळे, प्रियांका बुरंगे, सुमित कापसे, हर्षित गेहलोट, वैशाली आठवले, एचआर स्मिता आणि विदुला फडके यांनी केला. या शिबिरामध्ये व्हीके ग्रुप, श्रुडकॉम, मुथा असोसिएट्स तसेच इतर विविध संस्थांतील कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. यावेळी दीनानाथ मंगेशकर रक्तपेढीच्या डॉ. अभिप्सा श्रोत्रीया, प्रिया चव्हाण आणि प्रतीक कल्याणकर उपस्थित होते. समाजात स्वेच्छा रक्तदानाविषयी जनजागृती निर्माण करणे, नियमित रक्तदानाची सवय रुजविणे आणि 'रक्तदान हीच सर्वोच्च मानवसेवा' हा संदेश जनमानसात रुजविण्याचे उल्लेखनीय कार्य सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज करीत असल्याचे सांगत पुनीत जोशी आणि शिवराज सुतार यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. रक्तदान हे केवळ दान नसून, एखाद्या अनोळखी व्यक्तीला नवजीवन देण्याची संधी आहे. अपघातग्रस्त, गंभीर रुग्ण, शस्त्रक्रिया, थॅलेसेमिया तसेच कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी रक्ताची सातत्याने आवश्यकता भासत असते. त्यामुळे समाजात स्वेच्छा रक्तदानाची चळवळ अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हजतर्फे दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते, असे संस्थेच्या विश्वस्त अपूर्वा कुलकर्णी यांनी सांगितले. सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज आणि व्हीके ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान उपक्रमांमधून आजपर्यंत ३८५ हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून अनेक रुग्णांना जीवनदान देण्याच्या कार्यात मोलाचे योगदान दिले आहे. समाजात रक्तदानाची संस्कृती अधिक दृढ व्हावी आणि प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित रक्तदानाचा संकल्प करावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

भविष्यातही आरोग्य, पर्यावरण आणि समाजकल्याणाशी निगडित अशा विविध समाजोपयोगी उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हजचे अमोल उंबरजे यांनी दिली.

## पुण्यात छत्तीसगड टुरिझम बोर्डचा रोडशो

पुणे : (स. गांवकरी)




छत्तीसगडला विरंगुळा, वन्यजीव, वारसा आणि आध्यात्मिक पर्यटनासाठी उदयोन्मुख पर्यटनस्थळ म्हणून देशभरात अधिक प्रभावीपणे सादर करण्याच्या उद्देशाने छत्तीसगड टुरिझम बोर्ड ने उद्योग भागीदार फिक्की यांच्या सहकार्याने आज पुण्यातील हयात रीजेन्सी येथे यशस्वी छत्तीसगड टुरिझम रोडशो आयोजित केला. या रोडशोमध्ये छत्तीसगडमधील आघाडीचे टूर ऑपरेटर्स, हॉटेल व्यावसायिक आणि ट्रॅव्हल एजंट्स यांनी पुणे तसेच महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाशी संबंधित प्रतिनिधींशी बी२बी नेटवर्किंग आणि चर्चासत्रांद्वारे संवाद साधत व्यावसायिक सहकार्याच्या नव्या संधींचा शोध घेतला. या कार्यक्रमाला छत्तीसगड टुरिझम बोर्ड चे अध्यक्ष श्री नीलू शर्मा, छत्तीसगड टुरिझम बोर्ड चे व्यवस्थापकीय संचालक श्री विवेक आचार्य (आयएफएस) तसेच फिक्की छत्तीसगड टुरिझम समिती चे अध्यक्ष आणि छत्तीसगड ट्रॅव्हल ट्रेड असोसिएशन चे अध्यक्ष श्री जसप्रीत सिंह भाटिया उपस्थित होते.

## 'एमटीपीए'च्या अध्यक्षपदी अॅड. ज्ञानेश्वर नरवाडे

पुणे : (स. गांवकरी)



महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या (एमटीपीए) अध्यक्षपदी अॅड. ज्ञानेश्वर नरवाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत वर्ष २०२६-२७ साठी नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. यामध्ये अॅड. नरवाडे यांच्यासह उपाध्यक्षपदी अॅड. प्रणव शेठ, सचिवपदी मिलिंद हेंद्रे, सहसचिवपदी कैलास काशीद आणि खजिनदारपदी सीएमए नवनाथ नलावडे यांची निवड झाली. नवनिर्वाचित अध्यक्ष अॅड. ज्ञानेश्वर नरवाडे यांनी सभासदांचे आभार मानत, संस्थेची उज्ज्वल परंपरा जपत अधिक दर्जेदार, अभ्यासपूर्ण आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. कर सल्लागारांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी अधिकाधिक स्टडी सर्कल्स, सेमिनार्स आणि प्रशिक्षण कार्यक्रम केवळ पुण्यातच नव्हे तर राज्यातील विविध भागांत आयोजित केले जातील, असे त्यांनी सांगितले. नवीन कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली 'एमटीपीए' सभासदांच्या व्यावसायिक प्रगतीसाठी आणि कर क्षेत्रातील बदल प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अधिक जोमाने कार्य करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी माजी अध्यक्ष अॅड. नरेंद्र सोनावणे, सीएमए श्रीपाद बेदरकर, मनोज चितळीकर, अनुरुद्र चव्हाण, प्रसाद देशपांडे आदी उपस्थित होते. कर सल्लागार संस्था आपल्या कार्यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. दोन हजाराहून अधिक मान्यवर सभासद आहेत. संस्थेकडून सर्व कर सल्लागार, सनदी लेखापाल आदींना कर रचनेतील विविध बदल याबाबत मार्गदर्शन करण्याबरोबरच, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांबाबत सरकारच्या विविध योजनांचा प्रसार केला जातो.

## विठूनामाच्या गजरात दुमदुमला सूर्यदत्त नॅशनल स्कूलचा परिसर

- वारी म्हणजे भक्तीभाव, समता व सामाजिक ऐक्याचे प्रतीक
- प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांची भावना; सूर्यदत्त नॅशनल स्कूलमध्ये पालखी सोहळा उत्साहात



पुणे : (स. गांवकरी)

ज्ञानोबा माउली-तुकाराम, जय हरी विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल, असा विठ्ठनामाचा गजर आणि पर्यावरण संवर्धनाचा जागर करीत सूर्यदत्त नॅशनल स्कुलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेचा संस्कार चिमुकल्या विद्यार्थ्यांवर व्हावा, त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने सूर्यदत्त नॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी पारंपरिक पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषाने, अभंगांच्या सुरांनी आणि टाळ-मृदंगाच्या गजराने संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या पालखी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान करून दिंडीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. डोक्यावर तुळशीची वृंदावने, हातात भगवे पताके, टाळ-चिपळ्या आणि विठ्ठनामाचा अखंड गजर यामुळे शाळेच्या परिसरात पंढरीच्या वारीचे जिवंत चित्र साकार झाले. चिमुकल्यांनी सादर केलेल्या अभंग, भक्तिगीते आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थित पालक व शिक्षकांची मने जिंकली.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा, आषाढी वारीचे महत्त्व तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि इतर संतांच्या विचारांचा परिचय करून देण्यात आला. श्रद्धा, समता, सेवा, नम्रता आणि समाजहिताचा संदेश देणारी वारकरी परंपरा अनुभवात्मक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली. कथाकथन, भक्तिगीते, संवादात्मक उपक्रम आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांतून विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचा आनंद घेतला. पंढरपूरची वारी ही महाराष्ट्राची सर्वात मोठी सांस्कृतिक व धार्मिक परंपरा आहे. ही वारी म्हणजे संतपरंपरा, भक्ती, समता आणि सामाजिक ऐक्य यांचे प्रतीक आहे. यंदाच्या पालखी सोहळ्याचे विशेष आकर्षण 'जलसंवर्धन' हा सामाजिक संदेश होता. पाण्याचे महत्त्व, पाणी वाचविण्याच्या सवयी, पावसाचे पाणी साठविण्याची गरज आणि दैनंदिन जीवनात पाण्याचा जबाबदारीने वापर करण्याबाबत विद्यार्थ्यांना विविध कृतीप्रधान उपक्रमांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. संस्कृतीसोबतच पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा शाळेचा हा प्रयत्न विशेष कौतुकास्पद ठरला, असे प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी नमूद केले.

# समाजाच्या उन्नतीसाठी प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा

## श्रीनिवास कानडे यांचे मत; वंचित विकास संस्थेतर्फे 'विलास चाफेकर स्मृती पुरस्कार' प्रदान

पुणे : (स. गांवकरी)



एका बाजूला भारत झपाट्याने प्रगती करत असला, तरी दुसऱ्या बाजूला समाजातील अनेक घटक मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. या वंचित घटकांना मदतीचा हात देऊन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रत्येकाने आपल्या परीने खारीचा वाटा उचलणे आवश्यक असल्याचे मत कल्याणी ग्लोबल इंजिनिअरिंगचे कार्यकारी संचालक श्रीनिवास कानडे यांनी व्यक्त केले. वंचित विकास संस्थेतर्फे संस्थापक दिवंगत विलास चाफेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा यंदाचा 'विलास चाफेकर स्मृती पुरस्कार' कानडे यांना प्रदान करण्यात आला. बीएमसीसी कॅम्पसमधील सायरस पुनावाला ऑडिटोरियम येथे झालेल्या समारंभात संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार मर्लेचा, कार्यवाह व संचालक मीना कुर्लेकर, संचालक सुनीता जोगळेकर, सौ. कानडे आदी उपस्थित होते. आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित 'करावा विठ्ठल' या सांस्कृतिक कार्यक्रमानेही उपस्थितांना भक्तिरसाचा अनोखा अनुभव दिला.

श्रीनिवास कानडे म्हणाले, "वंचित विकास संस्थेशी माझे अनेक वर्षांपासून जिव्हाळ्याचे नाते आहे. दिवंगत विलास चाफेकर सरांचे सामाजिक कार्य मला जवळून पाहण्याची संधी मिळाली. विशेषतः 'नीहार' प्रकल्पातून त्यांनी केलेले विधायक कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांच्याकडून प्रेरणा घेत आम्ही गरवारे महाविद्यालयातील मित्रपरिवाराच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम सुरू केले. गेल्या पंधरा वर्षांपासून विविध सामाजिक संस्थांना सहकार्य करण्याचा आणि समाजोपयोगी कार्यात योगदान देण्याचा प्रयत्न करत आहोत."

मीना कुर्लेकर म्हणाल्या, समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीसाठी दिवंगत विलास चाफेकर यांनी केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सामाजिक विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार दरवर्षी प्रदान केला जातो. वंचित विकास संस्थेने समाजातील विविध घटकांसाठी जवळपास चार दशकांहून अधिक काळ योगदान दिले आहे. डॉ. श्रीकांत गबाले यांनी सूत्रसंचालन केले. अक्षय कुर्लेकर यांनी स्वागत प्रास्ताविक केले. तृप्ती फाटक यांनी आभार मानले.

पुरस्कार वितरणानंतर आकार पुणे निर्मित 'करावा विठ्ठल' या आगळ्यावेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. महेश पाटणकर यांच्या संकल्पना, लेखन आणि संगीत दिग्दर्शनाखाली साकारलेल्या या प्रयोगात पंढरपूरच्या वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक प्रवास संगीत, नाट्य आणि अभंगांच्या माध्यमातून उलगडला. या कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विठ्ठलनामाच्या गजराने आणि भक्तिमय सादरीकरणाने संपूर्ण सभागृह भारावून गेले. स्वपाली गाडे, रश्मी फोगले, सविता घारे, स्वाती रांजेकर, अनाहिता रांजेकर, स्वरदा गोसावी, सुनील सोमे, धनंजय वैष्णव, महेश पाटणकर आणि सिद्धा पाटणकर यांच्यासह कलाकारांनी प्रभावी अभिनय आणि सुरेल सादरीकरणातून वारीचा अनुभव रसिकांसमोर जिवंत केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)